माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था



स्थापना - १९८५ - जय सहकार - नोंदणी क्र. ९०१

# काटोल नागरी
# सहकारी पत संस्था मर्या. काटोल

**कार्यक्षेत्र : नागपूर जिल्हा**

मुख्य कार्यालय : घोडे प्लॉट, काटोल, जिल्हा नागपूर

Website : www.katolnagri.com

1st 1 Nov. 1985

40th 1 Nov. 2024

## ४० वा स्थापना दिन समारोह व सहकार सप्ताह

दिनांक १७ नोव्हेंबर २०२४



माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

## संस्थेचा ४० वा स्थापना दिन १ नोव्हेंबर २०२४ च्या निमित्ताने



# सर्व सभासदांचे हार्दिक अभिष्टचिंतन

# आपल्या काटोल नागरी सहकारी पतसंस्थेने

कुंतलापूर नगरीत सर्वप्रथम सहकार हा संस्कार रूजविला
सर्वसामान्यांनी, सर्वसामान्यांसाठी, सहयोगातून तो फुलविला
स्वत:च्या इमारतीतून, सुसज्ज कार्यालयातून,
सहकार समृद्धी कक्ष नामकरण करून तो सजविला
शाखा विस्तार, कक्ष विस्तार, क्षेत्र विस्तार करून तो विस्तारिला
विद्युत बिल भरणा केंद्रातून व स्ट्राँग रूम लॉकरच्या उपलब्धीतून तो विसावला
रू. २.१५ कोटीपर्यंतच्या भागभांडवलातून,
रू. ५२.०० कोटीपर्यंतच्या ठेवीतून तो चढविला
विविध उपक्रमातून, अनेक योजनातून, लोकसहभागातून तो वाढविला
ज्येष्ठ सभासद सन्मान योजना, सेवा योजना
सारख्या सभासदाभिमूख योजनेतून तो मिरविला
महिला सभासद उन्नत सोहळ्यातून तो स्तर उंचावला,
विश्वासाहर्ता, पारदर्शकता, कल्पकता, तत्परता, विनम्रता
या पंचसुत्रातून तो जोपासला
म्हणूनच संस्थेच्या हितासाठी,
इमारतीसाठी सहभाग ठेवून सहकार्य देवून वेळोवेळी विश्वास दाखविला
व आज '३५ व्या स्थापनादिनी' सभासद सहकारी शिक्षण / प्रशिक्षण उपक्रमातून
व '४० व्या स्थापनादिनी'
सहकार सप्ताहाचे आयोजन करून पतसंस्थेची व्यापकता वाढविली
व याच भरवश्याने, भक्कम पाठींब्याने,
सहयोगाच्या विश्वासाने, बळाने आमचा आत्मविश्वास दृढावला
व आज '४० व्या स्थापना दिनी माझी पतसंस्था - प्रथम क्रमांकावर'
अग्रेसित ठेवण्याचा निर्धार दुणावला
जय हो सभासदांची, जय हो ठेवीदारांची, जय हो ... जय हो !

माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

# काटोल नागरी सहकारी पत संस्था मर्या. काटोल

## संचालक मंडळ

40th
1 Nov. 2024



**घनश्याम पुंड**
अध्यक्ष



**नरेंद्र मानकर**
उपाध्यक्ष



**अर्जुनपंत शेटे**
संचालक



**प्रविण गोतमारे**
संचालक



**अजय लाडसे**
संचालक



**अमित काकडे**
संचालक



**सुभाष कोठे**
संचालक



**भिमराव काळे**
संचालक



**गणेश लवणकर**
संचालक



**गोपीचंद ढोके**
संचालक



**सचिन उमप**
संचालक



**लता मानकर**
संचालिका



**कोमल मानकर**
संचालिका



**ॲड.आनंद देशमुख**
तज्ञ संचालक



**दिनकर गहाणे**
तज्ञ संचालक



**दिवाकर खोडे**
व्यवस्थापक

माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

# काटोल नागरी सहकारी पत संस्था मर्या. काटोल

## कर्मचारी वृंद



सौ.अर्चना ढोले
अधिक्षक



श्री.दिवाकर खोडे
व्यवस्थापक



सौ.शैला राऊत
शाखा व्यवस्थापक



सौ.प्रतिभा वड्याळकर
वरिष्ठ लिपीक



श्री.दिलीप बाविस्कर
वरिष्ठ लिपीक



सौ.शितल लोनकर
वरिष्ठ लिपीक



सौ.भारती देशमुख
वरिष्ठ लिपीक



श्री.संदिप काळे
लिपीक



सौ.संपदा धोटे
लिपीक



सौ.प्रतिक्षा गोतमारे
लिपीक



श्री.धिरज राऊत
लिपीक



श्री.गोपाल जिचकार
लिपीक



श्री.गणेश उईके
लिपीक



श्री.अजय वाहणे
शिपाई



श्री.लिलाधर खेकाळे
मानधन सेवक



श्री.अनिल वैद्य
मानधन सेवक



**जगदीश किल्लोळ**
निवृत्त प्राचार्य, धनंजयराव गाडगीळ
सहकारी प्रबंध संस्थान, नागपूर
तज्ञ सदस्य, सहकारी कायदा
सुधारण मसुदा समिती

# शुभसंदेश

आपल्या काटोल नागरी सहकारी पतसंस्था मर्या चा ४० वा स्थापना दिन दिनांक १७/११/२०२४ रोजी आहे, ही बातमी मला कळविली अतिशय आनंद झाला.

आपण निमंत्रण पत्रिकेसोबत अहवाल पाठविला तो मी वाचला. आपल्या नेतृत्वाखाली गेल्या ५ वर्षात सभासद संख्येत २५% वाढ, भागभांडवल २०% वाढ आणि ठेवीमध्ये १५०% वाढ झाल्याचे या अहवालावरून माझ्या निदर्शनास आले. ही प्रगती स्पृहनिय आहे. आपले मन:पूर्वक अभिनंदन व आपल्या नेतृत्वाखाली अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो, हीच सदिच्छा.

दिनांक १७/११/२०२४

(जगदीश वामनराव किल्लोळ)

प्रति,

मा.श्री.घनश्यामजी पुंड

अध्यक्ष

काटोल नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

काटोल, जि.नागपूर

विदर्भातील पतसंस्थांचे जिव्हाळ्याचे व्यासपीठ

# विदर्भ क्रेडीट

॥ सहकारस्य मूलम् अर्थः ॥

VCCFA

को-ऑपरेटीव्ह सोसायटीज फेडरेशन लि. अमरावती.

Regd. No. HO/PN/AMT/GNL/10/2007
Website : www.vidarbhacredit.org
E-mail : vidarbhacredit10@gmail.com

सौ. लतिका राजुरकर — मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. अनिल म्हशाखेत्री — उपाध्यक्ष
श्री. दिलीप राजुरकर — कार्यकारी अध्यक्ष


## ** शुभेच्छा संदेश **

गेल्या ४० वर्षामध्ये काटोल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. काटोल या संस्थेने सभासदांना दिलेल्या सेवा, विश्वसनियता व सहकार तत्वे या त्रिसुत्रीच्या बळावर व मा. श्री. घनश्यामजी पुंड यांच्या नेतृत्वाने नागपुर जिल्हयामध्ये पतसंस्थेने नेत्रदिपक प्रगती केलेली आहे. संस्थेचे प्रामाणीक संचालक मंडळाने व सेवाभावी कर्मचारी वर्गाने पतसंस्थेला विलोभनीय यश मिळवून दिलेले आहे. सभासदांचा असाच विश्वास कायम राहुन, पतसंस्था भविष्यात अशीच प्रगती निरंतर करत राहो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

विदर्भ क्रेडीट को ऑपरेटीव्ह सोसायटीज फेडरेशनचे विविध उपक्रमात संस्था नियमीत सहभागी होत असुन, पतसंस्थेने आपल्या सभासदांसोबतच विदर्भातील पतसंस्थांसमोर आदर्श निर्माण केलेला आहे.

पतसंस्थेने केलेल्या उपक्रमांना उजाळा देणारी स्मरणिका प्रकाशित करण्याचा निर्णय मा. श्री. घनश्यामजी पुंड आणि संचालक मंडळाने घेतला ही स्तुत्य बाब आहे.

या उपक्रमाकरीता तसेच संस्थेच्या भावी वाटचालीकरिता माझ्या मन:पुर्वक शुभेच्छा !

**दिनांक :- ०५/११/२०२४**
**स्थळ :- अमरावती**

( दिलीप राजुरकर )
**कार्यकारी अध्यक्ष**

**प्रती,**
मा. श्री. घनश्यामजी पुंड
अध्यक्ष, काटोल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. काटोल र. नं. ९०१

रजि. क्र. एन.जी.पी./बी.एन.के/602/82

# नागपूर जिल्हा पतसंस्था व कर्मचारी पतसंस्था सहकारी संघ मर्या., नागपूर


मार्गदर्शक काकासाहेब कोयटे | अध्यक्ष राजेंद्र घाटे | उपाध्यक्ष मोरेश्वर मांगुळकर | मुख्य कार्यकारी अधिकारी विलास लेंडे

संचालक मंडळ
- किरण रोकडे उत्तर नागपूर
- राजेश्वर टेकाडे पश्चिम नागपूर
- सारंग गाडगे उमरेड तालुका
- तुळशीराम मोहाडीकर नागपूर शहर
- मनोज पांडे सिव्हिल लाईन
- गंगाधर लेंडे पूर्व नागपूर
- सौ. मंदा नारनवरे दक्षिण-पश्चिम नागपूर
- सौ. अर्चना बारमाटे नागपूर शहर
- सौ. अंजली मुळे दक्षिण नागपूर
- संजयकुमार रोकडे नागपूर ग्रामीण
- जयंत दाढे नरखेड तालुका
- प्रकाश वरूळकर कळमेश्वर तालुका
- छत्रपाल गोतमारे काटोल तालुका
- वामन नायगावकर रामटेक तालुका
- गोपाल राऊत कामठी तालुका
- देवानंद वंजारी मौदा तालुका
- नंदु कन्हेर हिंगणा तालुका
- नरसिंग धनविजय भिवापूर तालुका
- झामेश्वर काकडे पारशिवनी तालुका
- हरिभाऊ किरपाने तज्ञ संचालक
- ॲड. स्वप्नील मोंढे तज्ञ संचालक
- सी.ए. आशिष मुकीम स्विकृत संचालक
- ॲड. संदीप तलमले स्विकृत संचालक
- सौ. नीलिमा बावणे स्विकृत संचालिका


## शुभसंदेश

कुंतलापूर नगरीतील पहिली पत संस्था जी आजच्या काटोल तालुक्यातील अग्रगण्य पतसंस्था आहे. जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या काटोल नागरी सहकारी पत संस्था मर्या. काटोल ही संस्था सहकार चळवळीत सर्व समावेशक कार्य सुमारे ४० वर्षापासून करीत आहे.

दिनांक ६/५/१९९६ पासुन संस्थेचे अध्यक्ष मा. घनश्यामजी पुंड यांचे नेतृत्वात सुमारे ५००० सभासद संख्या असतांना ५० कोटींच्या ठेवी, ५ कोटी पेक्षा अधिक स्वनिधी व जवळपास २६ कोटीचे कर्जवाटप आहे. ही प्रगती स्पृहनिय आहे.

संस्थेने केलेल्या प्रगती दर्शक वाटचालीकरीता श्री.घनश्याम पुंड यांचे समवेत सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन व ही प्रगती अशीच उत्तरोत्तर होत राहो, हीच गुरूमाऊली चरणी प्रार्थना.

जय सहकार

(राजेंद्र घाटे)
अध्यक्ष

स्थळ : नागपूर
दिनांक : २५/१०/२०२४
प्रत :
श्री. घनश्याम पुंड
अध्यक्ष, काटोल नागरी सहकारी पत संस्था मर्या. काटोल
रजि. नं. ९०१/८५


कार्यालय : 'राजकमल', प्लॉट क्र. 502/01, नेहरूनगर, नंदनवन मुख्य सिमेंट रोड, स्टेट बँकेचे समोर, नागपूर-440024
संपर्क : (0712) 2731436, 9890401788, 9850338657, 9665447555
Email : districtfederationnagpur@gmail.com **Website :** www.nagpurfederation.com

## माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

## काटोल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. काटोल, र.नं.९०१

## = ४० वा स्थापना दिन समारंभ =

# नोहेबर २०२४ च्या निमित्त्याने 'अहवाल'

सर्वप्रथम आपल्या संस्थेच्या ४० व्या स्थापना दिनानिमित्त संस्थेच्या सर्व सभासदांना, ठेवीदार, ग्राहक तसेच हितचिंतक सर्वांना शुभेच्छा.

या प्रसंगी सर्व उपस्थितांचे स्वागत व अभिष्टचिंतन करून यानिमित्त्याने संस्थेचा अहवाल सादर करीत आहोत.

या कुंतलापूर नगरीत सर्वप्रथम १९८५ साली सर्वसामान्य जनांनी या पतसंस्थेची निर्मिती केली व आजही सर्वसामान्य जन या संस्थेचा कार्यभार सांभाळत आहेत, व सर्वसमावेशक सहकारी चळवळ लोकाभिमुख करणारी अग्रेसर पतसंस्था म्हणून आपली पतसंस्था रूजली आहे, झेपावत आहे.

आपल्या काटोल नागरी सहकारी पतसंस्थेच्या स्थापनेला आता ३९ वर्ष पूर्ण होत आहे व ४० व्या वर्षात पर्दापण करीत आहे. त्यानिमित्त्याने संस्थेच्या स्थापनेपासून आतापर्यंतची वाटचाल, संस्थेच्या योजना, उपक्रम, सुविधा इत्यादींचे अवलोकन करून संस्था अधिकाअधिक सभासदाभिमुख करण्याकरीता तसेच संस्था व सभासद यांचे संबंध अधिक दृढ करण्याचे प्रयत्न करता येते.

मित्रहो, ४० वा स्थापना दिन प्रसंगाच्या निमित्त्याने संस्थेच्या दशकानुसारच्या वाटचालीवर दृष्टिक्षेप टाकल्यास संस्थेच्या प्रगतीचा आलेख लक्षात येतो. त्यानुसार सन २००४-२००५ मध्ये संस्थेच्या २० व्या स्थापना दिनी वर्षात सभासद संख्या १२७१, भागभांडवल ३४.७० लाख तर ठेवी २६६ लाख इतक्या होत्या. त्यामध्ये दशकातील स्थापना दिन नुसार झालेली वाढ लक्षात येईल व २०२५ ची संकल्पना सिद्धी होईल अशी आशा बाळगुन आहोत.

गुणवंत पाल्याना प्रोत्साहनपर बक्षिस, ज्येष्ठ नागरीक आधार अभियान, सन्मान योजना, महिला उन्नत अभियान, ज्येष्ठ नागरीक दिन, महिला आंतरराष्ट्रीय दिन, शैक्षणिक, सहकारी, सामाजिक, उपक्रम, योग संस्कार शिबीर यासारखे अनेक उपक्रम व योजना राबवून सर्वांचा सहभाग व सहयोग संस्थेप्रती वाढविता आला.

त्याचप्रमाणे संस्था स्थापनेवेळी आपल्या पतसंस्थेचे कार्यक्षेत्र काटोल न.प. क्षेत्रापुरते मर्यादित होते. याच कालावधीत प्रथम 'काटोल तालुका' व नंतर 'नागपूर जिल्हा' कार्यक्षेत्र करण्यात आले. तसेच संस्थेच्या दोन्ही शाखेत स्ट्राँगरूम सहित सेफ डिपॉझिट ललॉकरचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

कुंतलापूर नगरीत 'काटोल नागरी सहकारी पतसंस्था' ''पहिली पतसंस्था, पहिली पसंत'' म्हणून तिची ओळख निर्माण झाली. तसेच आपण आता 'काटोल नागरी सहकारी पतसंस्था - माझी पतसंस्था' म्हणून तिची ओळख निर्माण केली. याबद्दल आपले अभिनंदन व आभार.

| स्थापना दिन | सन | सभासद | | भागभांडवल | | ठेवी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | वाढ | रक्कम | वाढ | रक्कम | वाढ |
| २५ वा | २००९-१० | २२९० | १०१९ | १०७ लाख | ७२ लाख | १०८१ लाख | ८१५ लाख |
| ३० वा | २०१४-१५ | ३४०९ | १११९ | १८२ लाख | ७५ लाख | २२२२ लाख | ११४१ लाख |
| ३५ वा | २०१९-२० | ४६०० | ११९१ | २६६ लाख | ८४ लाख | ३७०० लाख | १४७८ लाख |
| ४० वा | २०२३-२४ | ४९३७ | ४११ | २९३ लाख | ३६ लाख | ५११५ लाख | १२९५ लाख |
| संकल्पीत | २०२४-२५ | ५००० | ६३ | ३२० लाख | २७ लाख | ५५०० लाख | ३०५ लाख |

# माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

सद्याच्या अस्थिर व अनिश्चित काळात आर्थिक स्वरूपाचे कार्य करणाऱ्या पतसंस्थांना आव्हाने व जबाबदाऱ्या पार पाडणे अवघड होत आहे. वाढती स्पर्धा यामध्ये राष्ट्रीयकृत बँका, तगड्या खाजगी बँका, खालच्या स्तरावरील स्थानिक स्वरूपाच्या गटसंस्था याशिवाय बेकायदेशीर चालणाऱ्या वित्तसंस्था इत्यादी अनेक प्रकारच्या आर्थिक सदृश्य व्यवहार करणाऱ्या संस्था वाढतच आहे.

याशिवाय सहकारी क्षेत्राविषयी 'प्रतिकुल समाजभावना' या मुद्यांचा सुद्धा सहकारी पतसंस्था पुढील आव्हाने मध्ये नोंद करणे आहे.

परंतू प्रामुख्याने एकत्रितपणे कारभार चालविल्या वैयक्तिक बाबीपेक्षा सामुहिक बाबींना अधिक महत्व दिल्यास सहकारी क्षेत्रामध्ये स्थानिकसंबंध, वैयक्तिक-सामुहिक व्यक्तिमत्व, प्रत्यक्ष व्यवहार, संपर्क, पत व विश्वासर्हता या बाबींचा संयुक्त प्रभाव राहून सहकारी संस्था मोठ्या प्रमाणावर कार्य करु शकतात. याची प्रचिती आपण वेळोवेळी दिली व त्यामुळेच आपली पतसंस्था 'विश्वासपात्र पतसंस्था' म्हणून कायम आहे व स्पर्धेत टिकून राहून अडचणीवर मात करीत प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.

माहे नोहेंबर मध्ये आपल्या संस्थेचा स्थापना दिनच्या निमित्याने 'सहकार सप्ताह' आयोजित करुन प्रबोधन व सहकार मार्गदर्शन करण्याचाही प्रयत्न केलेला आहे. सहकार शिक्षण / प्रशिक्षण ही आवश्यक केले आहे. सभासदाने संस्थेची कार्यपद्धती समजुन घेणे, कामकाजात सहभाग घेणे, जागरूक व दक्ष राहणेसाठी सभासद शिक्षण / प्रबोधन आवश्यक असते. सहकारी चळवळीला नैतिक बाजू असून ती एकप्रकारे शैक्षणिक चळवळ आहे. जागृत सभासद, कर्तबगार सेवक व पुरोगामी विचाराचे पदाधिकारी तयार होण्यासाठी प्रशिक्षण / प्रबोधनाचा उपयोग होतो.

तसेच ४० व्या स्थापना दिन निमित्याने विविध असे कार्यक्रम ज्यामध्ये सहकार सप्ताह , प्रबोधन, ज्येष्ठ सभासद सन्मान उपक्रम, कृतज्ञता सोहळा, ४० वा स्थापना दिन स्मृती ठेव योजना स्मृती चिन्ह व इतर साहित्य वाटप इ. कार्यक्रम, उपक्रम आयोजित आहेत. आपण या सोहळ्यात, उपक्रमात सहभाग घ्याल, सहयोग ठेवाल, ही विनंती.

संस्थेचे भागधारक हे संस्थेचे मालक तर ठेवीदार हे आधारस्तंभ आहेत. संस्थेच्या ४० व्या स्थापना दिनाच्या निमित्याने जी 'स्मृती ठेव योजना' राबविण्यात आली त्या योजनेत ठेवी ठेवून पुन्हा एकदा 'विश्वासपात्र पतसंस्था' म्हणून शिक्कामोर्तब केल्याबद्दल धन्यवाद.

मी व माझे संचालक मंडळ, कर्मचारी मिळून आपल्या सर्वांच्या सहयोगातून संस्थेचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करून कुंतलापूर नगरीतील पहिल्या पतसंस्थेला आता ''माझी पतसंस्था'' My Own Society म्हणून पसंतीवर ठेवली आहे. हे कार्य करीत असतांना आतापर्यंत आपण जो सहयोग दिला, विश्वास ठेवला, भरघोस पाठींबा देवून पुन्हा पुन्हा समर्थन दिले याबद्दल आम्ही आपले सदैव ऋणी आहोत, आभारी आहोत असाच सहयोग संसंथेच्या हिताकरीता यापुढेही राहील अशी खात्री नव्हे तर ठाम विश्वास बाळगुन आहोत. पुनश्च एकदा निर्धार ठेवून, पुन्हा एकदा सर्व उपस्थितांचे, हितचिंतकांचे आभार मानून माझा अहवाल संपवितो.

जय सहकार

धन्यवाद

घनश्याम शे. पुंड
अध्यक्ष
संचालक मंडळाचे वतीने



# दशकानुसार तुलनात्मक आढावा

| सन | वर्ष | सभासद | | भागभांडवल | | ठेवी | | दशक - ठळक उपलब्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | वाढ | रक्कम | वाढ | रक्कम | वाढ | |
| १९८५ ते १९९५ | दशक | ३४७ ते ७९१ पर्यंत | ३४४ | २८,४२५ ते ५,३७,२६० | ५,०८,८३५ | निरंक ते ४,१६,८१४ | ४,१६,८१४ | सर्वप्रथम कुंतलापूर नगरीत पतसंस्थेची निर्मिती केली.<br>कार्यक्षेत्र - काटोल शहर |
| १९९५ ते २००५ | द्विदशक | ७९१ ते १२७१ पर्यंत | ४८० | ५,३७,२६० ते ३४,६९,६२५ | २९,३२,३६५ | ४,१६,८१५ ते २,६६,००,५१३ | २,६१,८३,६९९ | शाखा विस्तार - संस्थेची पंचवटी येथे शाखा सुरु केली<br>कार्यक्षेत्र विस्तार - संस्थेचे कार्यक्षेत्र 'काटोल तालुका' केले.<br>इमारत - संस्थेसाठी इमारत खरेदी करून संगणीकरण केले.<br>द्विदशक - द्विदशक वर्ष साजरे करून 'द्विदशकपूर्तीची उद्दिष्टे पूर्ण केली. |
| २००५ ते २०१५ | त्रिदशक | १२७१ ते ३४१० | २१३९ | ३४,६९,६२५ ते १,८१,४४,१०० | १,४६,७४,४७५ | २,६६,००,५१३ ते २२,२०,५१,८७३ | १९,५४,५१,३६० | कार्यक्षेत्र विस्तार - संस्थेचे कार्यक्षेत्र 'नागपूर जिल्हा' केले.<br>रौप्य महोत्सवी वर्ष - सन २०१० मध्ये 'रौप्य महोत्सवी व्हिजन' पूर्ण केले.<br>सेवा योजना - अंतर्गत विद्युत बिल भरणा केंद्र सुरू केले.<br>सुविधा केंद्र - स्ट्राँग रूम सहीत सेफ डिपॉझीट लॉकर सुविधा सुरू केली.<br>संकल्पित उद्दिष्टे - ३० वा स्थापना दिन समारंभ दि. १/११/१४ ला साजरा करून स्मृती ठेव योजना राबविली. या योजने रू. २.२५ कोटी चे वर पर्यंत ठेव गोळा केली. |
| २०१५ ते २०२४ | चतुर्थ दशक | ३४१० ते ४९३७ | १५२४ | १,८१,४४,१०० ते २,९३,४९,६५० | १,१२,०५,५५० | २२,२०,५१,८७३ ते ५१,९५,०४,१५३ | २९,७४,४२,२८० | महिला उन्नत अभियान<br>सहकारी शिक्षण / प्रशिक्षण उपक्रम<br>सहकार समृद्धी कक्ष स्थापना<br>अमृत महोत्सवी ज्येष्ठ सभासद सन्मान योजना<br>शाखा पंचवटी येथे स्ट्राँगरूम व लॉकर व्यवस्था केली<br>४० वा स्थापना दिन सोहळा |
| २०२५ | संकल्पित | ५००० | ६३ | ३२० लाख | २७ लाख | ५५०० लाख | ३०५ लाख | सतत ऑडीट वर्ग 'अ'<br>माझी पतसंस्था |



माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

# काटोल नागरी सहकारी पत संस्था मर्या. काटोल, र.नं.९०१/८५

## ४० वा स्थापना दिन - दिनांक १७/११/२०२४

## संस्थेचे प्रवर्तक मंडळ

| | |
|---|---|
| श्री.विठ्ठलराव संतोषरावजी काकडे | - मुख्य प्रवर्तक |
| श्री.सुभाष आनंदराव मानकर | - प्रवर्तक |
| श्री.वासुदेव नारायणराव चौधरी | - प्रवर्तक |
| श्री.रामराव बाजीरावजी धांडे | - प्रवर्तक |
| श्री.शेषराव हरीभाऊजी काळमेंघ | - प्रवर्तक |
| श्री.शंकरराव नथ्थुजी पाटील | - प्रवर्तक |
| श्री.नामदेवराव देवाजी वानखेडे | - प्रवर्तक |
| श्री.बबनराव शामरावजी जाऊळकर | - प्रवर्तक |
| श्री.माधवराव श्रावणजी तिघारे | - प्रवर्तक |
| श्री.देविदास नारायणरावजी वाळके | - प्रवर्तक |
| श्री.हनुमंत सितारामजी कुहीटे | - प्रवर्तक |

## संस्थेचे संस्थापक संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री.सुभाष आनंदराव मानकर | - अध्यक्ष |
| श्री.रामरावजी बाजीरावजी धांडे | - उपाध्यक्ष |
| श्री.विठ्ठलराव संतोषराव काकडे | - सचिव |
| श्री.नामदेवराव देवाजी वानखेडे | - सहसचिव |
| श्री.भाऊराव जानरावजी धर्मे | - संचालक |
| श्री.पद्माकर शंकरराव पंत | - संचालक |
| श्री.शेषराव हरीभाऊजी काळमेंघ | - संचालक |
| श्री.देविदास नारायणरावजी वाळके | - संचालक |
| श्री.हनुमंतराव सितारामजी कुहीटे | - संचालक |
| श्री.शिवाजी बापुरावजी देशमुख | - संचालक |
| श्री.मनोहरराव लक्ष्मणरावजी कावळे | - संचालक |

## संस्थेचे अध्यक्ष व त्यांचा कार्यकाळ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.सुभाष आ. मानकर | दिनांक १/११/१९८६ ते २०/५/१९८७ |
| २. | श्री.भाऊरावजी जा. धर्मे | दिनांक २१/०५/१९८७ ते ०७/०८/१९८७ |
| ३. | श्री.हनुमंतराव सि. कुहीटे | दिनांक ०८/०८/१९८७ ते २६/११/१९८९ |
| ४. | श्री.विठ्ठलराव सं. काकडे | दिनांक २७/११/१९८९ ते २८/०२/१९९३ |
| ५. | श्री.केशवराव उ. काकडे | दिनांक २९/०८/१९९३ ते ०६/०८/१९९५ |
| ६. | प्रशासक | दिनांक ०७/०८/१९९५ ते ०५/०५/१९९६ |
| ७. | श्री.घनश्याम शे. पुंड | दिनांक ०६/०५/१९९६ पासून ..... |

# माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था


















माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

## क्षणचित्रे : स्मृतीचित्रे

# वार्षिक सर्वसाधारण सभा - २०२४



## माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

**४० व्या वर्षात पदार्पण**

**संकल्पित उद्दिष्टे : २०२४-२५**

## VISION : 2025

| | |
|---|---|
| सभासद : ५,००० | ठेवी : ५५ कोटी |
| भागभांडवल : ३.२० कोटी | स्वनिधी : ७.५० कोटी |



# काटोल नागरी सहकारी पत संस्था मर्या. काटोल

**मुख्य कार्यालय**
घोडे प्लॉट, काटोल
संपर्क क्र. : 9067815846 / 9422125560

नोंदणी क्र : ९०१/८५

कार्यक्षेत्र - नागपूर जिल्हा

**शाखा कार्यालय**
पंचवटी, जलालखेडा मेन रोड, काटोल
संपर्क क्र : 8669385604 / 7038673033

## लहान बचत देई ... सुरक्षतेची मोठी हमी

### मुदत ठेव योजना

| कालावधी | व्याजदर | ज्येष्ठ नागरीक |
|---|---|---|
| ४५ दिवस ते १८० दिवस | ५% | -- |
| १८१ दिवस ते १२ महिने | ६% | -- |
| १२ महिने ते १५ महिने | ७% | ७.५०% |
| १५ महिने ते २४ महिने | ७.५०% | ८.००% |
| २४ महिनेचे वर | ७.६०% | ८.१०% |

**लॉकर्स सुविधा उपलब्ध**

**QR Code सुविधा उपलब्ध**

संस्थेच्या योजना : ▪ कर्ज योजना ▪ ठेव योजना ▪ सेवा योजना

### सुवर्ण तारण कर्ज योजना



- मासिक व्याज दर ७९ पैसे
- वार्षिक व्याज दर ९.५०%
- कालावधी १२ महिने
- मूल्यांकनाच्या ७५% कर्ज मिळण्याची व्यवस्था

### माल तारण कर्ज योजना



- मासिक व्याज दर ७९ पैसे
- वार्षिक व्याज दर ९.५०%
- कालावधी ३ महिने
- मूल्यांकनाच्या ६५% कर्ज मिळण्याची व्यवस्था

### स्थावर गहाण / गृह बांधणी कर्ज



- कर्ज मर्यादा २५ लाख पर्यंत
- मासिक व्याज दर १.०० रूपया
- वार्षिक व्याज दर १२%
- दरमहा किस्त भरणा केल्यास १% व्याजदरात सवलत
- कालावधी १८० महिने (१५ वर्ष)
- मूल्यांकनाच्या ६५% कर्ज मिळण्याची व्यवस्था (शहरी भाग)

**टिप : मुख्य शाखा व पंचवटी शाखा दोन्ही शाखेमध्ये सेफ डिपॉझीट लॉकर सुविधा उपलब्ध व दोन्ही शाखेत सुवर्ण तारण कर्ज सुविधा उपलब्ध.**

# == निसर्गाची हाक ==

तुम्ही एकही झाड लावू नका, ती आपोआप उगवतात. तुम्ही फक्त ती तोड नका ;
तुम्ही कुठलीही नदी स्वच्छ करू नका, ती प्रवाही आहे, स्वत: स्वच्छच असते,
तुम्ही फक्त तिच्यात घाण टाकू नका ;
तुम्ही शांतता प्रस्थापित करण्याच्या नादी लागू नका, सर्वत्र शांतताच आहे,
तुम्ही फक्त द्वेष पसरवू नका ;
तुम्ही प्राणी वाचवण्याचा प्रयत्न करण्याची गरज नाही, ती क्षमता निसर्गात आहे,
फक्त त्यांना मारू नका आणि जंगले जाळू नका ;
तुम्ही माणसं काहीही व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करू नका, सर्व व्यवस्थितच आहे,
फक्त तुम्ही स्वत:च व्यवस्थित राहा.

## सहकार वचने

**एकासाठी सर्व, सर्वांसाठी एक !**

**समृद्धीचा मार्ग सहकार**

**सहकार म्हणजे संस्कार!**

**भांडवलशाहीला खरा पर्याय सहकारच!**


**विना सहकार नाही उद्धार!**

**एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ!**

# जीवन म्हणजे सहजीवन,
# व सहजीवन म्हणजेच सहकार



# सभासद हा केंद्रबिंदु मानुन
# पतसंस्थेच्या सेवोचा विस्तार करावा.


भारतीय सहकारी आंदोलन
शताब्दी
100
1904
2004
CENTENARY
INDIAN CO-OPERATIVE MOVEMENT

## प्रार्थना



# इतनी शक्ती हमें देना दाता ...

इतनी शक्ती हमें देना दाता, मन का विश्वास कमजोर होना ।
हम चले नेक रस्ते पे, हमसे भुलकर भी कोई भूल हो ना ... ॥ धृ ॥

हर तरफ जुल्म है बेबसी है, सहमा सहमा सा हर आदमी है ।
पाप का बोझ बढता ही जाये, जाने कैसी ये धरती थमी है ।
बोझ ममता का तू ये उठा ले, तेरी रचना ये अंत हो ना ।
हम चले नेक रस्ते पे, हमसे भुलकर भी कोई भूल हो ना ।
इतनी शक्ती हमें देना दाता, मन का विश्वास कमजोर होना ॥ १ ॥

दूर अज्ञान के हो अंधेरे, तू हमें ज्ञान की रोशनी दे ।
हर बुराई से बचते रहे हम, जितनी भी दे भली जिंदगी दे ।
बैर हो ना किसी का किसी से, भावना मन में बदले की हो ना ।
हम चले नेक रस्ते पे, हमसे भुलकर भी कोई भूल हो ना ।
इतनी शक्ती हमें देना दाता, मन का विश्वास कमजोर होना ॥ २ ॥

हम ना सोचे हमें क्या मिला है, हम ये सोचे किया क्या है अर्पण ।
फुल खुशियों के बांटे सभी को, सबका जीवन ही बन जाये मधुबन ।
अपनी करूणा का जल तू बहा के, कर दे पावन हर एक मन का कोना ।
हम चले नेक रस्ते पे, हमसे भुलकर भी कोई भूल हो ना ।
इतनी शक्ती हमें देना दाता, मन का विश्वास कमजोर होना ॥ ३ ॥

हम अँधेरे में है रोशनी दे, खो ना दे खुद को ही दुश्मनी से ।
हम सजा पाये अपने किये की, मौत भी हो तो सह ले खुशी से ।
कल जो गुजरा है फिरसे ना गुजरे, आनेवाला वो कल ऐसा हो ना ।
हम चले नेक रस्ते पे, हमसे भुलकर भी कोई भूल हो ना ।

माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

स्थापना : १९८५

- जय सहकार -

नोंदणी क्र. : ९०१

# काटोल नागरी सहकारी पत संस्था मर्या. काटोल

कार्यक्षेत्र - नागपूर जिल्हा

# सहकार सप्ताह निमित्त
# संग्रहीत लेखन / टिपण

## ७१ वा अखिल भारतीय सहकारी सप्ताह

१४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२४

द्वारा प्रकाशीत

- स्वखुशीचे खुले सभासदत्व
- सभासदांचे लोकशाही नियंत्रण
- सभासदांची आर्थिक भागिदारी
- स्वायत्तता आणि स्वातंत्र्य
- शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती
- सहकारी संस्थांमधील परस्पर सहकार
- समुदायाप्रती निष्ठा



"बदलत्या काळानुसार सहकारी सामाजिक अर्थव्यवस्थेची पुर्नमांडणी

प्रेषक : काटोल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. काटोल जिल्हा नागपूर

१४ ते २१ नोव्हेंबर या काळात 'सहकार सप्ताह' साजरा केला जातो.
त्यानिमित्त वाचकांसाठी सहकार गीत देत आहोत.

# सहकार गीत

सहकाराला वंदन करूया आनंद भावे ।
सहकाराचे तत्त्व प्रभावी ठरले स्वानुभवे ।। १ ।।
सहकाराने भेदभाव हा दूर करू वेगे ।
सहकारास्तव सदा झटुया जन करूया जागे ।। २ ।।
सहकाराने अंगी येई बंधूभाव थोर ।
सहकाराने मानवतेचे गाठूया शिखर ।। ३ ।।
सहकाराचा मंत्र जपूया भक्तिभावाने ।
सहकाराचे कार्य करूया एकनिष्ठतेने ।। ४ ।।
सहकाराने शेतकऱ्यांचा विकास होईल ।
सहकाराने भारतास या सुराज्य लाभेल ।। ५ ।।
सहकाराने स्वतंत्र भारत करूया समृद्ध ।
सहकाराच्या जयजयकारे घूमवूया नाद ।। ६ ।।

# ७१ वा अखिल भारतीय
# == सहकार सप्ताह ==
# च्या निमित्त्याने

भारतीय राष्ट्रीय सहकार संघ मार्फत दिनांक १४ नोहेंबर ते २० नोहेंबर २०२४ दरम्यान ७१ वा अखिल भारतीय सहकार सप्ताह साजरा करण्याचे निश्चित झाले आहे.

त्या निमित्त्याने सहकारी चळवळीची वाटचाल व नव्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात सहकार चळवळीची उपयुक्तता, आव्हाने व सद्यस्थिती याबाबत चर्चा करणे अधिक संयुक्तिक वाटते.

भारतीय सहकारी चळवळीचा उगम ब्रिटीश राजवटीत झाला. सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी सहकारी संस्था निर्माण होवून भारतामध्ये सहकारी चळवळीचा उगम झाला व त्यातुनच सन १९०४ मध्ये पहिला सहकारी कायदा पारीत झाला व भांडवलशाही व समाजवाद अर्थव्यवस्थेचा सुवर्णमध्य असणारी सहकारी चळवळ भारतात सुरु झाली.

सन २००४ मध्ये भारतीय सहकारी चळवळीच्या वाटचालीला १०० वर्ष पूर्ण होवून गेली असून त्यानिमित्त्याने सहकारी चळवळीची शताब्दीही साजरी करण्यात आली.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही महाराष्ट्राचे बलस्थान आहे. वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांच्यासारख्या अनेक थोर निष्पात विभूतींनी खेड्यापाड्यामध्ये सर्वसामान्य जनतेची आर्थिक उन्नती करण्यासाठी सहकारी चळवळ राज्यात जाणीवपूर्वक रूजविली. आज या चळवळीने वटवृक्षाचे रूप धारण केले असून राज्याच्या सर्वांगीण विकासात सहकारी चळवळीचा मोठा वाटा आहे. सहकारी चळवळीमुळेच महाराष्ट्र देशात अग्रक्रमावर झळकतो आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहकाराला एक नवी गती मिळाली. विकासाच्या प्रक्रियेत सहकाराला अनन्य साधारण स्थान मिळाले. थोडक्यात स्वातंत्र्योत्तर काळात सहकाराची सर्वकष वाढ झाली. सामान्यजनाची आधारवड झाली.

१९९१ नंतर मात्र यापूर्वी ४० वर्ष जे आपले नियोजनाचे, संमिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण होते. त्यात आमुलाग्र बदल झाले ; परिवर्तन झाले. १९९१ साली बाजारीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, जागतीकीकरण या नवीन युगाचा प्रारंभ झाला.

१९९१ साली भारताची आर्थिक परिस्थिती हालाकीची झाली. आंतरराष्ट्रीय दबावामुळे खुल्या आर्थिक धोरणांचा अवलंब करून मुक्त अर्थव्यवस्था स्विकारावी लागली व नियंत्रण काढून टाकावे लागले.

जागतीकीकरणाच्या या आव्हानाला तोंड देण्यासाठी म्हणजे खुल्या खाजगी स्पर्धेत टिकण्यासाठीचे सहकारापुढे आव्हान उभे ठाकले. जागतीकीकरणाच्या या युगात खुद्धा दुर्बलांना आधार देणारी सहकारी संस्थाच आहे. सरकारीकरण व राजकीयकरण यामुळे सहकार अडचणीत येवू शकते.

सहकारी संस्था ह्या स्वायत्त करून राजकारण विरहीत असाव्यात. सहकारी संघटन निकोप, सक्षम व सहकारी व्यवस्थापन असले पाहीजे. तसेच सहकारी क्षेत्रात सहकारी मुल्ये व सहकारी तत्वे या आधारावर उत्तम व्यवस्थापन दिले तर सहकारात जागतीकरणाने निर्माण केलेली आव्हाने पेलण्याची शक्ति निर्माण होवू शकते.

काळाची पापले ओळखून पतसंस्था चळवळीनेही बदल आत्मसात करून पुढची वाटचाल करणे श्रेयस्कर आहे. नव्याचा स्विकार करीत जे वाटचाल करतात ते टिकतात. बदल स्विकारायला जे नकार देतात ते उपयुक्तता हरवून बसतात. नवनव्या संधी पतसंस्थेला उपलब्ध करून देण्यातच पतसंस्था चळवळीचे भविष्य दडलेले आहे.

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर १९६० पासून सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, सहकारी दुध संघ व सोसायट्या, खरेदी-विक्री संघ, ग्राहक भंडारे, सहकारी पतसंस्था, सहकारी सुतगिरण्या व तेलगिरण्या, सहकारी फळे व भाजीपाला उत्पादक विक्री संघ यासारख्या उभ्या राहिल्या. खूप चांगले काम करून फोफावल्या परंतू नंतर मागील २०-२५ वर्षात बऱ्याच सहकारी संस्था डबघाईस आल्यात. अस्तगताला जावून बंद पडल्यात ही वस्तुस्थिती आहे. परंतू जिथे कुशल, निःस्वार्थी, दुरदृष्टीचे पुरोगामी व परिवर्तनशील आणि सामाजिक बांधिलकी मानून कार्यरत राहणारे नेतृत्व लाभले तिथे सहकारी संस्था चांगल्या चालल्या आहेत आणि तिथेच सहकार यशस्वी झाला आहे, असे

निरीक्षण सहकार अभ्यासकांनी नोंदवून अशा संस्थाकडे डोळे उघडून पाहीले तरी भविष्यात सहकारी संघटनांचा उज्वल काळ दृष्टिक्षेपात येवू शकतो.

सद्यस्थितीत सर्वच क्षेत्रात बदल आता गतीमान झालेले आहेत. नव्या तंत्राचा व कौशल्याचा स्विकार करून सभासदांना जास्तीतजास्त सेवा देवून सहकार क्षेत्रातही वाटचाल करावी लागेल. सहकारी चळवळीचा वापर नियोजनबद्ध रितीने व्यावसायीक दृष्टिकोन समोर ठेवून आणि शास्त्रशुद्ध व्यवस्थापनेच्या संकल्पनेचा स्विकार करून केल्यास सहकारी संस्था खुल्या स्पर्धेतही टिकू शकतील असे भाकित सहकार तज्ञ करीत आहे. तसेच सहकारी क्षेत्रातील मनुष्यबळाचा विकास करण्याचीही गरज आहे. त्या अनुषंगाने सहकारी संस्थेच्या सर्वच्या सर्व घटकांना शिक्षण, प्रशिक्षण, सहकार मार्गदर्शन आवश्यक आहे.

**सहकार संकल्पना :**

सहकारासाठी इंग्रजीत Co-operation हा शब्द वापरला जातो. याचा अर्थ एकत्र काम करणे असा होतो.

सहकाराच्या काही व्याख्या अभ्यासल्या नंतर ही संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल. ''सहकार ही स्वेच्छेने एकत्र आलेल्या व्यक्तिंची, त्यांच्या समाईक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक गरजा व आकांक्षा पूर्ण करण्यासाठी स्थापलेली स्वयंशासित संयुक्त मालकीची व लोकशाही पद्धतीने चालविली जाणारी संस्था आहे.

संयुक्त प्रयत्नांनी एक समान ध्येय गाठण्यासाठी एकत्र आलेला व्यक्तिंचा समुह किंवा गट म्हणजे 'सहकार' असे म्हटले आहे. सहकारात समान गरज असलेले लोक एकत्र येतात. बऱ्याचदा ही गरज आर्थिक असते आपली गरज / सेवा करवून घ्याची हा उद्देश असतो. त्यामुळे नफा वगैरेला दुय्यम स्थान असते.

सहकाराच्या कल्पनेमागे केवळ आर्थिक सत्तेच्या केंद्रकरणास विरोध हाच विचार नसून त्याला समाजोन्नतीचा शांततापूर्ण सहजीवनाच्या तत्वांचा नैतिक पायाही आहे. परस्पर साह्याची भावना हे सहकाराचे उगमस्थान व सहकाराचे मुलतत्वही आहे.

सहकार विभागातर्फे प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेत सहकाराची तत्वे नमुद केलेली आहे.

१) ऐच्छिक व खुले सभासदत्व.
(Valuntary & Open Membership)

२) सभासदांचे लोकशाही नियंत्रण
(Democratic Member Control)

३) अर्थव्यवहारात सभासदांचा सहभाग
(Member Economic Participation)

४) स्वयंमशासन व स्वातंत्र
(Atonomy and Independance)

५) शिक्षण, प्रशिक्षण व माहीती
(Education, Training and Information)

६) सहकाराअंतर्गत सहकार
(Co-operation among cooperation)

७) सामाजिक बांधीलकी
(Concern for community)

**पतसंस्थेचे उद्देश :**

पतसंस्थेचा उद्देश हा सभासदांना अर्थिक सहाय्य करणे हाच असतो, मात्र या उद्देशपूर्तीसाठी जी सहकारी शिस्त अमलात आणली गेली त्यामुळे या उद्दिष्टपूर्तीसाठी लागणारा पैसा ही आपल्या सभासदांकडूनच उभा करावा ही संकल्पना अस्तित्वात आली. म्हणूनच सभासदांना बचतीची सवय लागावी आणि सभासदांना आर्थिक सहाय्य करावे हे दोन प्रमुख उद्देश नागरी पतसंस्थेचे ठरलेले आहेत. याशिवाय पतसंस्था सभासदांना सेवा देणे, यामध्ये सुरक्षा कक्ष, वीजबिल केंद्र इत्यादी वाढ होत आहे तसेच याशिवाय सामाजिक कार्यातही पतसंस्था सहभाग ठेवतात.

**पतसंस्थेवरील बंधणे व वैशिष्ठये :-**

पतसंस्था केवळ आपल्या सभासदांशीच व्यवहार करू शकतात. कर्ज व्यवहार, ठेवी व्यवहार इतर.

पतसंस्थांना कार्यक्षेत्रामध्ये व्यवहार करावे लागतात.

विश्वास हा पतसंस्थेच्या व्यवहाराचा पाया आहे.

स्थानिकता हे सुद्धा पतसंस्थेचे वैशिष्ठ आहे.

**पतसंस्था वरील नियंत्रण पद्धती -**

पतसंस्थावर नियंत्रण हे सहकार खात्याचे असते. हे नियंत्रण सर्वसाधारण कामकाज आणि हिशोबी कामकाज या संबंधाने असते. वैधानिक लेखापरीक्षकांकडून संस्थेचे दरवर्षी लेखापरीक्षण करून घेवूनही नियंत्रण ठेवले जाते. तसेच नियामक मंडळही वेळोवेळी आदेश पारीत करून नियंत्रण ठेवते. शेवटी आदर्श पोटनियम घालून दिले असून त्यानुसार अंतर्गत कामकाज चालत राहते. निवडणूक प्राधिकरण पतसंस्थांच्या निवडणूकीवर नियंत्रण ठेवत असते.

संपूर्ण जगात खुल्या आर्थिक धोरणाचे , खाजगीकरणाचे प्रस्थ निर्माण झाले आहे, होत आहे. समाजवादाकडून पुन्हा भांडवलशाहीकडे वाटचाल सुरू आहे. त्यामुळे सर्व व्यवसायात स्पर्धा

आहे. वित्तीय क्षेत्रातही स्पर्धा आहे. खाजगी क्षेत्रातील वित्तीय कंपन्या मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करीत आहे. त्यामुळे विशेषत: नागरी सहकारी पतसंस्था ना कर्जवाटपाची क्षेत्रे कमी झाली आहे., होत आहे. तसेच थकीत कर्ज वसुलीची समस्या, गुंतवणूकीची समस्या, व्याजदर इत्यादी समस्या उद्‌भवत आहेत.

याकरीता काळाबरोबर पतसंस्थांनाही बदल करावे लागतील. मागील दोन दशकात तर बदलाची प्रचंड गती झाली आहे, वाढत आहे. सर्वच क्षेत्रात गतीमानता आली आहे. बदल होत आहे. याकरीता आपले अस्तित्व टिकविण्याकरीता स्वयं शिस्त पाळून काळाला अनुसरून निर्णय घ्यावेच लागणार आहे. सहकारामध्ये यापुढे खाजगीकरणाचे सुत्रही पाळावे लागतील. आपल्या कमतरतांना ओळखून सहकारी क्षेत्रांनी कार्य न केल्यास सहकारी संस्था दिवसेंदिवस कमजोर होतील.

जगातील सर्वात मोठी सहकारी चळवळ भारतात आहे. देशात जवळपास ८.५ लाख सहकारी संस्था असून सुमारे ३० कोटी लोक सभासद आहेत. जवळपास प्रत्येक खेड्यात सहकारी संस्था आहे. सामान्यजनांचा आधार ह्या सहकारी संस्था झाल्या आहेत. त्यामुळे सहकाराला बळ देणे, सहकार वाचविणे, वृद्धींगत करणेच गरजेचे आहे.

देशातील प्रत्येक राज्यात सहकार मंत्रालय आहे व आता केंद्रामध्येही सहकार मंत्रालयाची निर्मिती झाली आहे. याचे सकारात्मक परीणाम होवोत अशी सर्वसामान्यजणांची अपेक्षा आहे.

आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संस्थांना लागणारे मनुष्यबळ, प्रशिक्षीत, विकासासाठी क्षमता असणारे असावे. कौशल्यप्राप्त मनुष्यबळासाठी स्वतंत्र प्रशिक्षण संस्था असावी. तसेच सहकार क्षेत्रात संशोधन करण्याकरीता सुद्धा वाव आहे. उत्कृष्ट सहकारी संस्थांना प्रोत्साहन देवून तशी संधी द्यावी लागेल. व त्याचे जोडीला तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा लागेल.

सहकारी संस्थांना व्यावसायिक क्षेत्रात अधिक कामगिरी करण्याकरीता शासनाच्या विविध योजना या क्षेत्राचे माध्यमातून राबवायला पाहिजे.

केंद्र व राज्य शासनाने समन्वयाने सहकाराच्या विकासासाठी नवे धोरण राबवून सामान्यजनांचा उद्धारकर्ता 'सहकार' हा वाढवावा हीच अपेक्षा

**काटोल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. काटोल**

**र.नं. ९०१/८५**

**कार्यक्षेत्र - नागपूर जिल्हा**



# सहकार आणि सहकार कायदे!

साभार -
सहकार मंत्रालय

सहकार म्हणजे सारख्या विचाराचे लोक एकत्र येऊन एखादी आर्थिक उलाढाल करणारी संस्था. यात एक व्यक्ती एक मत या प्रणालीचा वापर होतो. अगदी सुरूवातीला इंग्लंडमध्ये सहकारी तत्वावर असणारी शेतकऱ्याची संस्था होती. भारतात सर्वप्रथम सहकार चळवळीची सुरूवात १९०४ च्या सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार झाली. हा कायदा सहकार चळवळीच्या निकोप वाढीसाठी करण्यात आला होता. तथापि, उद्दिष्ट मर्यादित होते. या कायद्यातील तरतूदी अधिक व्यापक क्षेत्राला लागू करण्यासाठी त्यानंतर १९१२ चा सहकारी संस्थांचा कायदा करण्यात आला. त्या कायद्यानुसार सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची नोंदणी उपलब्ध झाली व या कायद्याची परिणामकारक अंमल बजावणी करण्यासाठी व प्रशासनाच्या कामकाजासाठी निबंधकाची नियुक्ती करण्यात आली आणि त्यामधूनच सहकारी विभागाची स्थापना झाली. केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सहकार हा विषय प्रांतिक सरकारांकडे सोपविण्याचा निर्णय झाल्यानंतर संबंधित प्रांतिक सरकारांनी आपापले कायदे करून घेण्यास सुरूवात केली. मुंबई प्रांतासाठी १९२५ चा सहकारी कायदा करण्यात आला. सन १९४७ मध्ये बॉम्बे ॲग्रीकल्चरल प्रोड्युस मार्केट रेग्युलेशन ॲक्ट (१९३९) व बॉम्बे मनी लेंडर ॲक्ट (१९४६) हे कायदे निबंधकाच्या नियंत्रणा खाली आणण्यात आले.

### स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची स्थिती :

देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारताच्या संविधानातील तरतूदीनुसार सहकार हा विषय संबंधित राज्य सरकारांकडे ठेवण्यात आला. त्यानुसार राज्य शासनाने सद्यस्थितीत अस्तित्वात असलेला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० हा कायदा पारीत केला. या कायद्यात सहकारी संस्थांची नोंदणी, संस्थांची कर्तव्ये व विशेषाधिकार, राज्य शासनाचे संस्थांना विविध स्वरूपाचे आर्थिक व तत्सम सहाय्य, संस्थांची मालमत्ता व निधी, संस्थांचे व्यवस्थापन, संस्थांच्या व्यवहाराचे लेखापरिक्षण, चौकशी, तपासणी व देखरेख, विवादांची सोडवणूक, संस्थांचे कामकाजांचे समापन, निवडणूका, गुन्हे व शास्ती, अपिले, पुनरिक्षण व संस्थांचे कामकाजाविषयी अन्य सर्वसाधारण बाबींविषयीच्या सविस्तर तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

सन १९७० मध्ये तत्कालिन सहकार मंत्री यशवंतराव महिते यांनी सहकार विभागाच्या तसेच सहकार चळवळीच्या पुनर्रचनेसंदर्भात श्वेतपत्रिका काढली होती. त्यास अनुसरून राज्यस्तरीय लेखासमिती स्थापन करण्यात आली व तद्नंतर स्वतंत्र साखर संचालनालय (सध्याचे साखर आयुक्तालय), पणन संचालनालय आणि वस्त्रोद्योग संचालनालय अस्तित्वात आले. सन १९७५ मध्ये सहकार न्यायालयाची स्थापना व सन १९८१ मध्ये तालुका स्तरावरील कार्यालयाची स्थापना करून सहकार विभागाचा विस्तार करण्यात आला. सन १९७७ मध्ये दुग्धसंस्था, दुग्धविकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या. मार्च १९८९ पासून मंत्रालय पातळीवर कृषी व सहकार विभाग यांचे विभाजन होऊन सहकार व वस्त्रोद्योग विभाग हा स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला.

### ९७ वी घटना दुरूस्तीनंतर सहकार कायद्यातील बदल

भारतीय संविधानातील ९७ व्या घटना दुरूस्तीनंतर घटनेच्या अनुच्छेद १९ (१) (सी) मध्ये सुधारणा करून सहकारी संस्था स्थापन करणे हा मूलभूत हक्क घोषीत करण्यात आला आहे. तसेच अनुच्छेद ४३ (बी) नुसार राज्य शासनाने सहकारी संस्थांचे स्वायत्त कामकाज, लोकशाही नियंत्रण व व्यावसायिक व्यवस्थापनास चालना देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

संविधानातील वरील सुधारणांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये आवश्यक त्या सुधारणा करून दिनांक १४/२/२०१३ रोजी अध्यादेश जारी करण्यात आला. त्यानंतर विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी या विधेयकास मान्यता दिल्यानंतर दिनांक १३/८/२०१३ रोजी सुधारीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रसिद्ध करण्यात आला आहे. वरील सुधारणांच्या अनुषंगाने सहकार कायदयात खालील महत्वाचे बदल करण्यात आले आहेत. कलम २-तज्ञ संचालक, कार्यलक्षी संचालक व क्रियाशील सदस्य यांची व्याख्या समाविष्ट. कलम २४-अ प्रत्येक सहकारी तिचे सभासद, अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करणे बंधनकारक आहे. कलम २७- अक्रियाशील सभासदास संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेत मतदान करता येणार नाही.

कलम ७३ सीए-कलम १४६ मधील गुन्ह्याकरिता कलम १४७ नुसार शिक्षा / दंड झाल्यास अशा व्यक्तीस संचालक पदासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे.

कलम ७३ सीवी- सहकारी संस्थांची निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण घटीत करण्याची तरतूद.

कलम ७५ - संस्थेने आर्थिक वर्ष संपल्यानंतर चार महिन्यात लेखापरिक्षण करुन घेणे व सहा महिन्यात संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करणे बंधनकारक आहे.

कलम ७९ - संस्थेच्या कामकाजाशी संबधित विविध प्रकारची विवरण पत्रे सहा महिन्यात निबंधकास सादर करणे बंधनकारक.

कलम ८३ - चौकी पूर्ण करण्यासाठी कमाल मर्यादा ६ महिने (कमाल ३ महिने मुदत वाढ) निश्चित करण्यात आली आहे.

कलम ८८ - चौकशी पूर्ण करण्यासाठी कमाल मर्यादा २ वर्षे (कमाल ६ महिने मुदत वाढ) निश्चित करण्यात आली आहे.

### सहकारी पतसंस्था

आपल्या देशामध्ये सुमारे ८० हजाराच्यावर नागरी सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. यातील तब्बल २० हजार पतसंस्था या एकट्या महाराष्ट्रात अतिशय प्रभावीपणे कार्य करीत आहेत. महाराष्ट्रातील पतसंस्थाची वार्षिक उलाढाल ही २ लाख कोटीहून अधिक आहे. समाजातील तळागाळातील लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी सहकारी पतसंस्थांचे महत्वपूर्ण योगदान आहे. गोरगरिबांना आर्थिक मदतीचा हात देणे तसेच बेरोजगारांना त्यांच्या व्यवसायासाठी पुंजी उपलब्ध करून देऊन त्यांना आत्मनिर्भर करण्याचे मोलाचे कार्य देशभरातील पतसंस्था अतिशय नेटाने करीत आहेत. आणि या सर्व गोष्टींचा आपल्या देशातील अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. आज प्रत्येक गावात, तालुक्यात सहकारी पतसंस्थांचे विस्तीर्ण जाळे विणल्या गेले आहे. लोकांना सावकाराच्या जाचातून मुक्त करण्यासाठी सहकारी पतसंस्थांनी दिलेल्या मदतीचा हात अतिशय मोलाचा ठरला आहे. सहकारी पतसंस्थांची सध्या सुरू असलेली घोडदौड बघता काही मोठ्या पतसंस्थांना बँकेमध्ये परिवर्तित करण्याचा मोठा निर्णय येणाऱ्या काळात केंद्रीय सहकार खाते व भारतीय रिझर्व बँक घेणार आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रावरील लोकांचा विश्वास आणखी दृढ होणार आहे.



## स्वावलंबी सहकार

● मनुष्य जेवढा स्वतंत्र असतो, तेवढाच स्वावलंबी असतो. समाजाला सुव्यवस्थित ठेवण्यासाठी ज्यावेळी स्वावलंबन आवश्यक होते, त्यावेळी ते अवलंबन रहात नाही तर ते सहकार बनते.

● सहकारामध्ये गोडवा आहे. जे सहकार्य करतात त्यांच्यामध्ये कोणीही अशक्त नसतो किंवा सशक्त नसतो. प्रत्येकजन दुसऱ्याप्रमाणे सारखाच असतो.

● एका कुटुंबातील सदस्य परस्परावलंबी असतात, तेवढेच ते स्वावलंबी असतात. माझे किंवा तुझे ही भावना तिथे नसते. ते सर्व सहकारी असतात.

● आणि तसेच ज्यावेळी एक समाज किंवा एक राष्ट्र किंवा संपूर्ण मानवजात एक कुटूंब आहे असे आपण समजतो, त्यावेळी सर्व माणसे सहकारी बनतात.

- महात्मा गांधी

# सामान्य सभासद (माणूस) सहकारी क्षेत्राचा कणा



जगदीश किल्लोळ
निवृत्त प्राचार्य, धनंजयराव गाडगीळ
सहकारी प्रबंध संस्थान, नागपूर
तज्ञ सदस्य, सहकारी कायदा
सुधारण मसुदा समिती

सहकारी क्षेत्राच्या उगमाच्या वेळेस म्हणजे रोशडेल येथे स्थापित झालेल्या संस्थेने १८४४ मध्ये कामकाजाच्या कार्यपद्धतीचे जे धोरण ठरविले होते. त्यात संस्थेचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने चालविण्याचे तत्व ठरविले. आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने काळाअनुरूप तत्त्वात थोडाफार फरक केला. तथापि सामान्य माणूस घटक धरून खुले सभासदत्व व लोकशाही व्यवस्थापन या दोन तत्त्वांचा कधीच लोप झाला नाही. वर्तमान काळात लागू असलेल्या सहकाराच्या सात तत्त्वातच खुले सभासदत्व व लोकशाही नियंत्रण ही दोन तत्त्वे अबाधित आहे. लोकांनी आपले हित जोपासण्यासाठी सहकाराचा मार्ग धरावा हे अपेक्षित आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या ग्रामगितेत म्हणतात,

''लोकशाही म्हणजे लोकांचे हित!
लोकांकडून व्हावे हातोहात.
सर्व मालक म्हणुनी सत्य!
जबाबदारी ओळखावी.''

राष्ट्रसंतांनी दिलेला हा संदेश सहकारी तत्त्वाला सहकारी क्षेत्राकडून म्हणजेच सभासदाकडून अपेक्षित आहे. लोकशाही मूल्य जोपासली जावी, यासाठी सहकारी कायद्यात, नियमात व पोटनियमात विशेष तरतुदी केल्या आहेत. सहकारी संस्था म्हणजे सभासदांच्या हितासाठी सभासदांनी चालविलेली, सभासदांच्या मालकीची संस्था होय. म्हणजेच सामान्य सभासद हा कोणत्याही सहकारी संस्थेचा महत्त्वाचा घटक असून त्याच्या योगदानातून, जागृततेतून व क्रियाशिलतेतून सहकारी संस्थांचा विकास आणि पर्यायाने सामान्य माणसाचा विकास साधला जावू शकतो.

सहकारी कायद्यात सभासद कोणास होता येते? सभासद होण्यासाठी पात्रता कोणत्या, सभासदाचे प्रकार, सभासदांचे अधिकार व कर्तव्य यासाठी विशेष तरतुदी आहेत.

१) **सभासद कोणास होता येईल** : सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील कोणताही पात्र व्यक्ती सहकारी संस्था / बँकेचा सभासद होऊ शकतो. यास जात, धर्म, लिंग, वर्ण असा भेदाभेद नाही.

२) **सभासद होण्यासाठी पात्रता** : सभासद सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीचे वय किमान १८ वर्षाचे असावे. तो कार्यक्षेत्रात राहणारा असला पाहिजे. फौजदारी गुन्ह्याखाली सजा झालेली नसावी. त्याने संबंधित संस्थेची प्रवेश फी व भाग (शेअर्स) खरेदी केलेला पाहिजे. समान उद्देश धारण करणाऱ्या संस्थेचा तो सभासद नसावा. फर्म मालक किंवा कंपनीचा संचालक नसावा. इच्छुक असणाऱ्यांनी रितसर नमुन्यात संस्थेकडे अर्ज केला पाहिजे. संबंधित अर्ज संचालक मंडळाने स्विकारला पाहिजे, जर संचालक मंडळाने अर्ज नाकारला तर निबंधकाकडे अर्ज सादर करता येतो.

३) **सभासदाचे प्रकार** : सहकारी कायद्याप्रमाणे सभासदाचे खालील प्रकार आहेत.

**सामान्य सभासद**

अ) क्रियाशील

ब) अक्रियाशील

सहकारी सभासद

नाममात्र सभासद

**सामान्य सभासद** : ज्या व्यक्तीने रितसर नमुन्यात सभासद होण्यासाठी अर्ज केला आहे. त्यासोबत फी देऊन भाग (शेअर्स) खरेदी केला आहे

व त्याच्या अर्ज संचालक मंडळाने स्वीकारण्यात आला आहे. त्यास सामान्य सभासद असे म्हणतात. ९७ व्या घटना दुरूस्ती अंतर्गत कायद्यात बदल झाले. त्यानुसार सामान्य सभासद, क्रियाशील सभासद व अक्रियाशील सभासदामध्ये वर्गीकृत केले आहे.

अ) **क्रियाशील सभासद :** जो व्यक्ती सामान्य सभासद आहे त्याने संबंधित संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे आवश्यक ते भाग खरेदी केली असले पाहिजे. संस्था जो व्यवहार करते त्या व्यवहारात त्यांचे अंशदान पाहिजे. उदा. सहकारी बँका / पतसंस्था ठेवी स्वीकारण्याचे, कर्ज देण्याचे व्यवहार करतात, त्यामुळे अशा सामान्य सभासदाने पोटनियमात ठरविलेली किमान ठेवीची रक्कम जमा ठेवली पाहिजे किंवा तो व्यक्ती कर्जदार असेल तर तो थकीत नसावा आणि महत्वाचे म्हणजे पाच वर्षातून किमान एका सर्वसाधारण सभेत उपस्थित असला पाहिजे. अशा सभासदांना निवडणुकीत भाग घेता येईल, मतदानाचा अधिकार राहील.

अशा क्रियाशील सामान्य सभासदांनी संस्थेला दिलेल्या व्यवहारामुळे आणि साधारण सभा (व्यवस्थापन) व निवडणुकीत संस्थेचे हित संरक्षण आणि विकास हे उद्दिष्ट ठेवून दिलेल्या सक्रीय सहभागामुळे संस्थेची पर्यायाने सभासदाची व समाजाची प्रगती साधू शकते. त्यामुळे खऱ्या अर्थाने क्रियाशील सामान्य सभासद संस्थेचा कणा ठरतो.

ब) **अक्रियाशील सभासद :** कोणतीही व्यक्ती सामान्य सभासद असेल तथापि पोटनियमाला अपेक्षित इतक्या रक्कमेचा तो संस्थेत व्यवहार करीत नसेल आणि संस्थेच्या / बँकेच्या सर्वसाधारण सभेत पाच वर्षातून किमान एकदा तरी उपस्थित नसेल, अशा सामान्य सभासदाची वर्गवारी अक्रियाशील करण्यात येते. अशा सभासदांना निवडणुकीत भाग घेता येत नाही, मतदानाचा अधिकार नाही.

**सहकारी सभासद :** ज्या संस्थेच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात भांडवल आवश्यक असते ते संस्थेच्या भागाचे दर्शनी मूल्य अधिक रकमेचे असते. उदा. सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या यांच्या भागाचे मूल्य अधिक किंमतीचे असते. लहान शेतकऱ्यांना संस्थेचा एक भाग खरेदी करणे आर्थिकदृष्टया अडचणीचे असते. अशा संस्थेच्या एक भाग एकापेक्षा अधिक व्यक्ती संयुक्तरित्या खरेदी करू शकतात व संस्थेच्या व्यवहारात (उलाढालीत) सहभागी होऊ शकतात. जेव्हा अनेक व्यक्ती मिळून एक भाग खरेदी करतात, तेव्हा त्यापैकी ज्यांचे नाव पहिले लिहिलेले आहे त्यास केवळ मतदानाचा अधिकार असतो. त्याच्या अनुपस्थितीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या सहसभासदास मतदानाचा अधिकार प्राप्त होतात.

**नाममात्र सभासद :** संस्थेबद्दल ज्यांना सहानुभूती आहे, संस्थेच्या विकासाची इच्छा आहे. अशा व्यक्ती नाममात्र सभासद होऊ शकते, तथापि त्याला संस्थेच्या व्यवहारात व निवडणुकीत सहभागी होता येत नाही. तसेच मतदान करता येत नाही.

**सभासदाची हकालपट्टी :** जो सभासद सतत अक्रियाशील आहे, संस्थेच्या हिताविरूद्ध व्यवहार करतो, संस्थेची मदनामी करतो आणि न्यायालयान फौजदारी गुन्ह्यांतर्गत शिक्षा केली आहे अशा सभासदाच्या बाबतीत कलम ३५ प्रमाणे सभासदत्व रद्द करण्याची तरतूद आहे. कोणतीही सहकारी संस्था, कायदयात नमूद असलेल्या कार्यपद्धतीची प्रक्रिया पूर्ण करून अशा व्यक्तीचे सभासदत्व रद्द करू शकते.

# राजकारण विरहित सहकार चळवळच ठरेल सक्षम



**राजेंद्र घाटे**
अध्यक्ष
नागपूर जिल्हा पतसंस्था व कर्मचारी पतसंस्था सहकारी संघ मर्या., नागपूर

कोणत्याही राष्ट्राच्या विकासामध्ये समाजकारण, अर्थकारण, राजकारण व व्यापारीकरण या चार मुलभूत बाबींचा स्पर्श केला जातो. हे चारही विभाग स्वतंत्ररित्या कार्यरत राहिली तर ते राष्ट्र प्रगती पथावर राहत असते. आपल्याला दिसत ते आणि म्हणून अनेक तत्वज्ञांनी असं म्हटलेलं आहे. अर्थकारणामध्ये समाजकारणामध्ये व्यापारीकरणांमध्ये राजकारणाचा समावेश नसावा आणि राजकारण हे राजकीय व्यक्तींनी करावं अशा स्वरूपाचा त्यामधला गर्भित अर्थ आहे परंतु सद्यस्थितीमध्ये कोणत्याही राष्ट्राच्या व्यवस्थेचे चिंतन करत असतांना आपणाला असं दिसून येतं की राष्ट्राच्या समाजकारणामध्ये अर्थकारणामध्ये व्यापारीकरणांमध्ये राजकाणाचा समावेश झाला आहे. त्याला सहकार चळवळ देखील अपवाद ठरलेली नाही, सहकारी चळवळीच्या जे सूत्र समाजाच्या आर्थिक घटकाची उन्नती व्हावी आर्थिक समानता यावी आणि एकत्र येणाऱ्या व्यक्तींना आपापले कार्य पूर्ण करण्यासाठी त्याची मदत व्हावी या सूत्राला कुठेतरी छेद आता सध्या जाताना दिसत आहे, याचं कारण सहकार चळवळ ही राजकारणापासून अलिप्त राहिली पाहिजे हा विचार मागे पडून, राजकारणाच्या उभारणीसाठी राजकीय व्यक्तिमत्व घडवण्यासाठी म्हणून सहकारी संस्थांची स्थापना करणे हि प्रचलित रूढी झाली आहे. त्यामुळे मूळ सहकार चळवळीचा गाभा कुठे बाजूला जाताना आपल्याला दिसतोय आणि हळूहळू सहकार चळवळीची वाटचाल ही खाजगीकरणाकडे होती आहे.

वास्तविक पाहता यामध्ये सर्वच बाबींवर आता चिंतनाची वेळ आली आहे समाजाची बदलत चाललेली प्रवृत्ती, शासकीय कर्मचाऱ्यांचा सहकार चळवळीकडे बघण्याचा दृष्टिकोन, संस्थाचालकांचा सहकार संस्थांमध्ये असलेला वावर, सभासदांची संस्थेप्रती असलेली उदासीनता, सेवक वर्गाचं अकार्यक्षमतेकडे झुकलेलं वर्तन, या सगळ्या गोष्टी या सहकार चळवळीला मारक ठतर चालवलेल्या आहेत. यावर राजकारणाचा काय परिणाम आहे तर आज स्थिती अशी आहे सहकारी संस्थांमध्ये सभासद जे आहेत यामध्ये राजकीय गट निर्माण झाल्याचा आपल्याला दिसत आहे. सरकारी कर्मचारी जे आहेत त्यांच्यावर राजकारणी व्यक्तींचा दबाव आणि त्यानुसार निर्णय प्रक्रिया व त्यमध्येबरोबर - चूक न पाहता, सत्यता न पडताळता राजकीय द्वेषापोटी सहकारी संस्थांना वेठीस धरणे सहकारात काम करणाऱ्या व्यक्तींना वेठीस धरणे ही प्रवृत्ती विकसित होतांना आपल्याला दिसत आहे. कर्मचारी वर्गामध्ये जे काही बदल करण्याची अपेक्षा आहे, त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये बदल, नवीन नवीन समाजामध्ये येऊ घातलेले बदल, जेणेकरून आपल्याला पाहता येईल की आज सर्वच क्षेत्रांमध्ये संगणकीकरणाचा प्रभावी वापर होऊ लागला आहे ज्याला आपण ई-गव्हर्नन्स म्हणतो आता त्या पद्धतीची रचना सर्वच क्षेत्रांमध्ये आहे. सहकार क्षेत्र देखील त्याला अपवाद नाही. उलट काही देशांच्या सर्वे मधून असं निदर्शनास आले आहे की, भारत हा असा देश आहे की ज्यामध्ये बँकेबाबत बँकिंग व्यवहाराबाबत टेक्नॉलॉजीचं जास्तीत जास्त वापर प्रभावीपणे हा भारतामध्ये केला जातो किंवा भारत प्रथम क्रमांकावरती आहे असे काही निष्कर्ष आपल्यासमोर येतांना दिसत आहेत.

नुकत्याच भारतामध्ये जी २० परिषद झाली. त्या परिषदेमध्ये जे परकीय पाहुणे आले होते त्यावेळी भारतीय बाजारपेठेमध्ये ज्यावेळी ते फेरफटका मारत होते तर त्यांच्या असे निदर्शनास आलं की, छोटे-छोटे दुकानदार छोटे-छोटे रस्त्यावरती विक्री करणारे फिरते विक्रेते, यांच्याकडे देखील क्यूआर कोड आलेला आहे आणि लोक ऑनलाईन मोबाईलवर सरळ सरळ आर्थिक देवाण-घेवाण करताय यातून आपल्याला असं लक्षात येतं की सर्व क्षेत्रांमध्ये आता यांत्रिकीकरणाची क्रांती झाली आहे. या यांत्रिकीकरणाचा स्वीकार करणे हे सहकारी संस्थांतील कर्मचाऱ्यांच्या समोर एक मोठे आव्हान आहे. म्हणून त्यांनी याला सुद्धा पाठिंबा दिला पाहिजे, नवीन नवीन गोष्टी आत्मसात केल्या पाहिजे. ग्राहक सेवेच्या बाबतीमध्ये सुद्धा आज अर्थसेवा ही आता इमर्जन्सीच्या सेवांसारखं २४ तास सेवा देण्याची आता वेळ आपल्याकडे आली आहे. रात्री होणारे प्रवास रात्री अपरात्री एकमेकांच्या देशाशी होणारे दळणवळण, यामध्ये माणसाला केव्हाही आता अर्थाची गरज लागते आणि म्हणून सेवा वेळा सुद्धा आपल्याला तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक देता येतील का? या सगळ्या गोष्टींची आव्हानेसमोर आहेत. परंतु राजकारणाच्या

हस्तक्षेपामुळे या प्रत्येक गोष्टीला कुठे ना कुठेतरी खिळ बसली आहे आणि म्हणून सहकारी संस्थांचा कारभार हा राजकारण विरहित जर झाला तर खऱ्या अर्थाने स्वायत्तता मिळेल आणि खऱ्या अर्थाने या संस्था समाजाच्या गरजा पूर्ण करू शकतील.

पूर्वी सहकारी संस्था स्थापन करत असतांना असणारी गरज ही काळाच्या ओघांमध्ये आता बदलत चालली आहे. आज गृहनिर्माण संस्थांची जागा बिल्डरने घेतली, दुग्ध सहकारी संस्थांची जागा मोठ्या-मोठ्या खाजगी डेअरीने घेतली आहे. औद्योगिकरणाची जागा बडे-बडे उद्योगपतींनी घेतली आहे, अर्थकारणामध्ये सुद्धा नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांसारख्या मोठ्या-मोठ्या कंपन्या येऊ घातल्या आहेत. परकीय गुंतवणूक सुद्धा मोठ्या प्रमाणामध्ये येऊ लागली. अश्या सगळ्या बदलांमध्ये सहकारी चळवळ कुठेतरी आपल्याला मागे पडत चालली आहे. सहकार हा विचार मागे पडत चाललाय असं दिसतंय याचं कारण शोधलं तर आपल्या लक्षात येईल की कुठेतरी राजकारणाच्या माध्यमातून या सहकारी संस्थांना वेठीस धरले जात आहे आणि त्यामुळे ही चळवळ स्पर्धात्मक काळामध्ये टिकण्यात मागे पडली आहे. यावर चिंतन करत असतांना सहकारातील मंडळीनी खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीची तत्वे याचा कुठेतरी पुन्हा एकदा पुनर्मूल्यांकन करणे गरजेचे आहे. सहकारी चळवळ विकसित व्हावी यासाठी नेमकं काय केलं पाहिजे आता उदाहरणार्थ सांगायचं झालं तर कार्यक्षेत्र हा एक विषय सहकारी संस्थांच्या बाबतीमध्ये असतो की त्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र तालुका, जिल्हा, विभाग, राज्य, दोन राज्य अशा स्वरूपाचे दिले जाते. वास्तविक पाहता हा विचारपूर्वीच्या काळामध्ये योग्य होता कारण कम्युनिकेशनची साधनं नव्हती. एकमेकांबद्दल ओळख परिचय होत नसेल आणि म्हणून त्यांच्या संस्थांचं काम त्या-त्या कार्यक्षेत्रापुरतेच राहणे योग्य होते, परंतु बदलत्या काळामध्ये आज कुठूनही कुठेही पैसे ट्रान्सफर होतात. कुठलीही स्थावर जंगम मालमत्तेची माहिती सहज गुगल मॅन सारख्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकते.

कोणाचे क्षेत्र कुठे आहे हे सुद्धा आपण बसल्या जागेला जगातले लोकेशन हुडकू शकतो, त्याचा पेपर पाहू शकतो, आधार कार्ड, पॅनकार्ड यासारखी कार्ड्स आज आपल्याला देशाच्या व्यक्तींचे आयडेंटिफिकेशन देऊ शकतात. यातूनच आपल्याला सहकारी चळवळीला कार्यक्षेत्र मुक्त करता येईल कां? आज अनेक ठिकाणी मायग्रेशन्स होत असतात अगदी महाराष्ट्राचा विचार करायचा म्हटलं तर महाराष्ट्राच्या विविध तालुका, जिल्हा, गाव पातळीवरुन लोक आज पुणे मुंबई, नागपूर या ठिकाणी मायग्रेट झाली आहेत, ती शिक्षणासाठी झाली आहे किंवा व्यवसायासाठी झाली आहेत, नोकरीसाठी झाली आहेत. अशा वेळेला त्याची मूळ जे काही स्थावर जंगम मालमत्ता असते त्याच्या राहत्या गावी असते मग ते कदाचित नागपूर मध्ये कुठेतरी एखाद्या तालुक्याच्या ठिकाणी तो असेल पण तो आता नोकरी निमित्त मुंबईला स्थायिक झालाय तर मग त्याला मुंबईमध्ये कुठेही सहकाराच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध होऊ शकत नाही का तर त्याचा मूळ कारण त्याची स्थावर जंगम मालमत्ता आहे नागपूर आणि परिसरामध्ये आहेत. यामुळे सहकारी संस्थांच्या व्यवहारातही परिणाम करू लागले आहेत. याबाबत सहकार चळवळीने कुठेतरी आता चिंतन करण्याची आवश्यकता आहे आणि राजकीय मंडळीत यावर निर्णय घेऊ शकते, कारण असं की आपल्याकडे जी सिस्टीम सहकार चळवळीची आहे याचे सर्व अंतिम अधिकार हे सहकार खातं की जे सहकार मंत्र्याच्या माध्यमातून चालवलं जातं त्यांच्याकडे आहेत. मग शेवटी अशा पद्धतीची चिंतन होऊन त्याला कायद्याच्या चौकटीमध्ये बसवणं व्यवहाराच्या चौकटीमध्ये बसवणं आणि कायदा आणि व्यवहार यांची सांगड घालून ही चळवळ सुदृढ करणे सक्षम करणे यासाठी राजकारणी व्यक्तींनी त्यामध्ये सकारात्मक विचार करण्याची आवश्यकता आहे.

अशा पद्धतीचे अनेक गोष्टी आज सहकारी चळवळीला सहकारी संस्थांना बंधनकारक झाल्यात की ज्या स्पर्धात्मक काळामध्ये त्यांना स्पर्धा करण्यासाठी त्यात तंत्रज्ञान असेल, मनुष्यबळ असेल, कायद्यातील तरतुदी असतील या अपुऱ्या पडतात आणि म्हणून मला या माध्यमातून असं सुचित करायचे आहे की, सहकार चळवळ ही मुलत: राजकारणापासून विरहित असली पाहिजे.

स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांचे खूप मोठे यासंदर्भातलं विधान माझ्या आता स्मरणात येतंय त्यासाठी गावामध्ये सहकारी संस्था स्थापन करायचे असेल किंवा झाली असेल तर विविध प्रकारच्या राजकीय मंडळींनी एकत्र यावं वैचारिक विविधता असलेल्या व्यक्तींनी एकत्र याव, जात, धर्म, वंश, पंथ, लिंग अशा सगळ्या प्रकारच्या लोकांनी एकत्र याव आणि आपल्या आर्थिक उन्नतीसाठी आपल्या सामाजिक उन्नतीसाठी सहकारी संस्थेची स्थापना करावी, पण सहकारी संस्था चालवत असतांना आपल्या विचारांचे आपल्या राजकीय जो काही आपण विचार स्वीकारला असेल त्याचे जो काय आपला सामाजिक विचार असेल या सगळ्यांचे लिंगभेदाचे विचार असतील हे सगळे विचार आणि त्या विचारांची जोडे हे सहकारी संस्थेच्या दरवाज्याच्या बाहेर ठेवावेत, केवढा एक मोठा विचार या

व्यक्तीने आपल्यासमोर मांडला आणि याचमुळे खरं तर महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळ सुदृढ झालेली आपल्याला पाहता येते ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये क्रांती जर झाली असेल तर ती सहकार चळवळीमुळे झाली आणि जिथे जिथे सहकार चळवळीला एक उत्तम नेतृत्व मिळालं त्या-त्या परिसरामध्ये सहकार चळवळीच्या माध्यमातून विकास झालेला आपल्याला पाहायला मिळतो.

आपल्याला अगदी महाराष्ट्रीील उदाहरणार्थ पाहायचं म्हटलं तर पश्चिम महाराष्ट्र असेल. गुजरात मध्ये पाहिजे असेल तर अमूल सारखा प्रकल्पाला (आनंद डेअरी). अशा आपल्या नागपूर शहरांमध्ये सुद्धा विदर्भ प्रिमिअर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी आहे. अशा पद्धतीच्या अनेक संस्था आहेत की ज्यांनी आपलं कार्य अतिशय उत्तमरित्या त्या काळामध्ये केलं आणि त्याचा परिणाम समाजातील समाजकारण, अर्थकारण, व्यापारीकरण सुदृढ होण्यासाठी झाला. हाच प्रयोग भविष्यात देखील यशस्वी होण्यासाठी या चळवळीला जे-जे योगदान मते भांडवलाच्या स्वरूपात नसावं आज आपल्याला असं पाहता येतं की, राजकारणाच्या माध्यमातून सहकारी संस्थांना भांडवल पुरवण्याचे जे काही धोरण ठरवलं जातंय त्याच्यामुळे सुद्धा या संस्था विकलांग झालेल्या आणि त्यांना कोणीतरी फंड्स देतोय अशी त्यांच्या मनामध्ये वृत्ती निर्माण झाली. मग सहज मिळालेल्या पैशाचा विनियोग त्याच कामासाठी होतोय असे आता आपल्याला दिसत नाही. पण आपल्या लक्षात येईल की सहकार चळवळीमधये आशिया खंडातला पहिला सहकार साखर कारखाना हा प्रवरा नगरला सहकार महर्षी विखे पाटील यांनी काढला. त्यांच्या चरित्र जर वाचले तर त्यामध्ये आपल्याला असं लक्षात येतं की, एक-एक रुपया गोळा करून त्यांनी समाजामध्ये फिरून या सहकारी साखर कारखान्यासाठी भागभांडवल जमा केले. आता लक्षात घ्या की त्यामुळे त्या समाजाची नाळ त्या कारखान्याशी जोडली गेली की माझा या कारखान्यात एक रुपया आहे. ही भावना निर्माण झाली. आज सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी जे कार्यकर्ते आहेत ते कुठल्या ना कुठल्यातरी राजकीय विचाराचे आहेत व सरकार कडून भांडवल मिळवण्यासाठी आग्रही राहतात आणि स्वाभाविकपणे हट्ट पुरवला जातो, परिणाम संस्था बंद पडतांना दिसत आहेत.

आपल्या राज्याची राज्य सहकारी बँक ह्या अशा वागणुकीमुळे अडचणीत आली. अशा पद्धतीचा राजकीय हस्तेक्षपाने जर ह्या सहकारी संस्था उभ्या राहणार असतील, चालवल्या जाणार असतील तर ही चळवळ बदनाम व्हायला वेळ लागणार नाही. बदनामी आपोआप होतं आणि मग आपल्या असं लक्षात येतं की खाजगी क्षेत्र पुढे येतांना दिसतात. यामुळे मला यातून कुठल्याही विषयावरती कुठल्याही पक्ष राजकीय नेते यांच्यावर टिका टिपणी करायची नाही. मला यातून हे सांगायचे आहे, सहकारात काम करत असतांना ही सहकार चळवळीची निकोप वाढ कशी होईल यासाठी सर्व राजकीय मंडळी एकत्र यावं आपले राजकीय विचाराचे जोडे बाहेर ठेवावेत आणि ह्या सहकारी चळवळी सक्षम करण्यासाठी त्याचा कसा उपयोग करता येईल याचा विचार व्हावा. महाराष्ट्रामध्ये असा विचार अनेक वेळा झालाय त्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ स्थापन करण्यात आले पण आज त्याची परिस्थिती अशी आहे, ते कुठे चालु स्थितीत आहे, ॲक्टीव्ह आहे, काही ॲक्टीव्हीटी चालू आहेत असं निदर्शनास येत नाही. खरंतर या महामंडळाचा उपयोग करता येवू शकतो.

येथे माननीय मुख्यमंत्री अध्यक्ष असतात. सहकार मंत्री उपाध्यक्ष असतात. अशा परिस्थितीमध्ये या महामंडळामध्ये कुठल्या सहकारी संस्था अडचणीत आल्या म्हणून त्यांना मदत झाली आहे किंवा त्यांना काही मार्गदर्शन झालेला आहे, अशा पद्धतीची काही रचना आपल्याला दिसून येत नाही. मग ही जी उदासिनता आहे, ही उदासीनता कुठेतरी दूर व्हावी आणि सहकार चळवळ सक्षम सुदृढ व्हावी आणि खऱ्या अर्थानं आज जो अंतोदयाचा विषय समोर आलेला आहे की, समाजातल्या शेवटच्या घटकाचा विकास झाला पाहिजे तर राष्ट्राचा विकास होईल ही कल्पना आता सातत्याने पुढे येतीये. ही कल्पना प्रत्यक्षात आणायची जर असेल तर आपल्या असे लक्षात येईल की सहकार चळवळीशिवाय पर्याय नाहीये. कारण या सहकारामुळे ही ग्रामीण भागामध्ये व्यक्ती व्यक्ती पर्यंत पोहोचली आहेत. खाजगी क्षेत्राला आता तिथपर्यंत पोहोचण्यासाठी बराच पल्ला गाठावा लागेल, बराच वेळ घालवावा लागेल आणि म्हणून सरकारने जसं पोस्टामधून आर्थिक व्यवहार करण्याचे निर्णय घेतलाय सहजरित्या लोकांना या सुविधा मिळाव्यात हे जसं शासनाने धोरण ठरवलं तसं असलेल्या सहकारी चळवळीच्या माध्यमातून गावोगावी असलेल्या विविध कार्यकारी सहकारी संस्था, शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या गृहनिर्माण सहकारी संस्था, शहरांमध्ये ग्रामीण भागांमध्ये निर्माण झालेल्या सहकारी बँक, पतसंस्था, दूध डेअरी यांना चालना देण्यासाठी आपल्याला काय करता येईल अशा पद्धतीची एक रचना आपल्या राज्यामध्ये विकसीत व्हावी. आजपर्यंत महाराष्ट्राने सहकारी चळवळीचे नेतृत्व केलेले आहे. मला असं वाटतं की पुन्हा एकदा आम्ही सर्वच मंडळींनी सर्व कार्यकर्ते मंडळींनी महाराष्ट्रातील सहकार चळवळ नुसती सुदृढ सक्षम नव्हे तर देशाला, जगाला आदर्शवत कशी ठरेल यासाठी कार्य करण्याची आवश्यकता आहे.

हे कार्य कशा ह्या सहकार सप्ताहाच्या माध्यमातून जे काही मासिक मधून प्रसिद्ध होते, व्याख्यानांमधून प्रबोधन होतात यातून एक चांगला निष्कर्ष येऊन लवकरात लवकर आपल्या राज्याची एक सहकार चळवळ सक्षम व्हावी, ही या निमित्ताने सदिच्छा.

# ७१ व्या राष्ट्रीय सहकारी सप्ताह निमित्याने ....



**दिलीप राजुरकर**
कार्यकारी अध्यक्ष
विदर्भ क्रेडीट को-ऑप.
सोसायटीज फेडरेशन, लि.
अमरावती

अनेक व्यक्तिंनी एकत्र येऊन, समान गरजा उद्देश व ध्येय प्राप्तीकरीता सहकारी संस्था स्थापन करणे आणि ती चालविणे यालाच सहकार म्हणतात. कारण भारतामध्ये सहकाराची पाळेमुळे खोलवर रूजलेली आहे. भारतात दरवर्षी १४ ते २० नोव्हेंबर या काळात अखिल भारतीय गणतंत्र सप्ताहाचे आयोजन केले जाते. यावर्षी ७१ वा भारतीय राष्ट्रीय सहकार सप्ताह आयोजित केला जाणार आहे. भारताला ५ ट्रीलीयन डॉलरचे अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरीता सहकारावरही मोठी जवाबदारी निश्चित केलेली आहे. सहकारातील विभिन्न सहकारी संस्थांचे व अनेक राज्यांचा सामाजिक व आर्थिक विकास करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सहकार सप्ताहाचे आयोजन केले जाते.

भारतामध्ये सन १९४५ मध्ये आर.जी.सराया यांचे अध्यक्षतेखाली सहकारी समिती स्थापन झाली. सहकाराचा मुख्य उद्देश सभासदांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक गरजा पूर्ण करण्याकरीता सहकारी संस्थेची निर्मिती करणे हा आहे. सन १९०५ साली सर सिद्धनगौडा पाटील यांनी कर्नाटकामध्ये सहकारी संस्थेचे कनागीनहाल या गावामध्ये प्रथम सुरूवात केली. त्यामुळे त्यांना सहकारी आंदोलनाचे जनक मानले जाते. परदेशात सन १८४४ साली रॉशडेल लंकाशायर मध्ये सहकारी संस्थेची सुरवात झाली.

सहकार सप्ताहाचे आयोजन भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाद्वारे केले जाते. सहकार सप्ताहाचे आयोजन महाराष्ट्रामध्ये सहकारी संस्था मोठ्या प्रमाणावर करतात. पतसंस्थांनी दरवर्षी १४ ते २० नोव्हेंबर या काळात सभासदांचे सामाजिक व आर्थिक उन्नती साधण्याकरीता विविध उपक्रम आयोजित करावे. सभासद वाढीकरीता ग्राहक मंळावे आयोजित करणे, सभासदाकरीता आरोग्य शिबीर आयोजित करणे, स्वच्छता कार्यक्रम आयोजीत करणे, वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करणे, सभासदांच्या पाल्याकरीता करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणे, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे, ज्येष्ठ सभासदांचा सत्कार करणे, सभासदांच्या सामाजिक अडचणी विचार घेऊन त्यांचे मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणे, व्यावसायिक कार्यशाळा आयोजित करणे अशा प्रकारचे सभासदांचे आर्थिक उन्नतीकरीता सामाजिक कार्यक्रम आयोजित करून सहकार सप्ताह साजरा करावा.

पतसंस्था सभासदांचे आर्थिक उन्नती साधण्याकरिता सभासदांच्या ठेवी गोळा करून गरजु सभासदांना कर्ज पुरवठा करते. बऱ्याच वेळा सभासद आर्थिक प्रगती करीता पतसंस्थेकडून कर्ज घेतो व्यवसायाचे अचूक मार्गदर्शन उपलब्ध न झाल्यामुळे व्यावसायीक अडचणी वाढतात. परिणामी संस्थेची थकबाी वाढते. सभासदांच्या परतफेडीच्या क्षमतेवर अनिष्ट परिणाम होत असल्यास त्याची कारणे शोधुन त्याला मार्गदर्शन करणे काळाची गरज आहे. याकरीता विविध व्यावसायीक मार्गदर्शन केंद्र प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत आहे. त्यांचेकडून सभासदांना मोफत मार्गदर्शन उपलब्ध करून दिल्यास सभासदांचा संस्थेप्रती जिव्हाळा निर्माण होतो. थकबाकीचे फक्त कायदेशीर आकलन न करता सामाजिक आकलन करणे अधिक उचित राहील.

सहकार सप्ताहाच्या निमित्ताने पतसंस्थेला सभासदांचे सामाजीक दायित्व पूर्ण करण्याची संधी मिळत आहे. सभासदांच्या आर्थिक व सामाजिक गरजा विचारात घेऊन सहकार सप्ताहाचे कार्यक्रमात विविध विषयाचा समावेश करावा. ७१ व्या राष्ट्रीय सहकारी सप्ताहाच्या महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीला हार्दिक शुभेच्छा.

# पतसंस्थांच्या गुणात्मक बदलाची गरज ....



ॲड.आनंद देशमुख
तज्ञ संचालक
काटोल नागरी
सहकारी पत संस्था मर्या. काटोल

१०० वर्षापेक्षा अधिक गौरवशाली इतिहास असलेली महाराष्ट्रातील सहकारी चळवळ सावकारीला समर्थ पर्याय म्हणून कार्यान्वित झाली व समाजातील छोट्यात छोट्या घटकापर्यंत, खेडोपाडी पोहचून सामान्य-जनांच्या उत्थानाचे कार्य करीत आली. आता मात्र तिला भांडवलशाही बरोबरच खुली जागतिक स्पर्धा, मुक्त अर्थव्यवस्था इत्यादीमुळे निर्माण होत असलेल्या समस्यांचा मुकाबला करावयाचा आहे व त्यासाठी सहकारी संस्थांना गुणात्मक व संघटनात्मक बदल करून नवा चेहरामोहरा धारण करून सामोरे जाणे अगत्याचे झाले आहे. केवळ पतसंस्थांचा विचार केला तरी असे दिसून येते की, महाराष्ट्रात त्यांची संख्या २८,००० एवढी आहे. २ कोटी १८ लाख सभासद, ३२ हजार कोटी रूपयांच्या ठेवी, २७ हजार कोटी रूपयाचे कर्जवाटप, २ लाख ८० हजार पिग्मी एजंट, ५ लाख ५० हजार कर्मचारी तर ४ लाखावरून अधिक संचालक व पदाधिकारी आहेत. या आकड्यावरूनच पतसंस्थांचा संख्यात्मक विकास लक्षात येतो. तर दुसरीकडे विविध कारणांनी अनेक सहकारी संस्था / पतसंस्था अडचणीत येत असल्याचे व विश्वासार्हता गमावत असल्याचेही निदर्शनास येते. म्हणून पतसंस्थेच्या संख्यात्मक वाढीबरोबरच गुणात्मक व संघटनात्मक बदल अत्यावश्यक आहे.

संस्थेच्या गुणात्मक वाढीसाठी सर्वप्रथम गरज आहे ती प्रशिक्षणाची. कुठलीही संस्था यशस्वी होण्यामागचे मुख्य कारण असते योग्य दिशा देणारे नेतृत्व आणि त्याला साथ देणारे मनुष्यबळ आणि कुठल्याही संस्थेचा मनुष्यबळास त्यांच्या कामात परिपुर्णता आणण्याकरीता निरंतर प्रशिक्षण, हे एकमेव माध्यम आहे. प्रशिक्षणामुळे वैयक्तिक व सांघिक फायदे मिळतात म्हणून संस्थेतील कर्मचारी, सेवकांना तर प्रशिक्षण द्यावेच लागेल. परत त्याचबरोबर संचालक, पदाधिकारी यांचेही प्रबोधन करणे जरूरीचे ठरते. सहकारी तत्व, कायदे, नियम, उपविधी, सहकारी खाते, रचना, संरचना याची अद्ययावत माहीती व अहवाल यांचा परिचय त्यांना अवगत करून देवून सहकारी क्षेत्रात कार्य करण्यासाठी आवश्यक सहकारी वृत्ती, निष्ठा इ. बाबी प्रशिक्षणाद्वारे साध्य कराव्या लागतील. यापूर्वी साधारणतः अल्पशिक्षीत, अपुरे आर्थिक बळ, साधनांची कमतरता असलेल्या सामान्य कार्यकर्त्यांनी पतसंस्थेची निर्मीती केल्याचे दिसून येते. सहकारवर श्रद्धा ठेवून सभासदांशी आपलेपणा, सेवाभावी वृत्ती जोपासून काही संस्थांनी आपली प्रगतीही साधली. परंतू सद्यस्थितीत उच्चविद्या विभूषित अधिकारी, अद्यावत साधन सामुग्री व भक्कम आर्थिक बळ असणाऱ्या खाजगी बँकासोबत, अर्थ व्यवस्थेसोबत स्पर्धा करावयाची आहे. त्यामुळे आता या मायक्रो बँकींग युगात पतसंस्थाचे सभासद ग्राहक हे आय.सी.आय.सी.आय. किंवा एच.डी.एफ.सी. सारख्या बँकाकडे वळण्याचा धोका पुढे संभवतो. त्यांना थोपविण्यासाठी व स्पर्धेत टिकण्यासाठी प्रशिक्षणाची नितांत गरज आहे. महत्वाचे म्हणजे गुणात्मक वाढीसाठी नवनविन योजना, संगणिकृत साई-सवलती पुरवून त्वरीत सेवा पुरविणे, व्यवहारात पारदर्शकता आणणे, संस्था सभासदाभिमुख करणे, जमाखर्च, लेखापरिक्षणात अचूकता आणणे, याशिवाय अद्यावत संकलनही तयार ठेवावे लागेल. यानंतरचा सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे वसुली यंत्रणा, जितक्या जोमाने कर्जप्रदान करण्यात येते, तितक्याच वेगाने वसूली होणे गुणात्मक वाढीसाठी आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र, नियमित यंत्रणा उभी करावी लागेल. कर्मचाऱ्यांचे सेवानियम व वेतनश्रेणी निश्चित करून त्यांना प्रशिक्षणाबरोबरच शैक्षणिक पात्रता व व्यावसायिक पात्रता वाढीसाठी प्रोत्साहित करणे गरजेचे झाले आहे.

संघटनात्मक बाबीमध्ये आता केवळ संचालक मंडळाचे गठण करून भागणार नाही तर त्यांचेमध्ये समन्वय व संपर्क असावा लागेल. तसेच संस्थेचे कर्मचारी वर्ग व व्यवस्थापकीय मंडळ यांचाही परस्पर सुसंवाद राखून लोकशाही व्यवस्थापनाद्वारे सांघीक भावना वृद्धींगत कराव्या लागतील.

''मागचे पाहून पुढे चालू'' अशी प्रथा पुढे न ठेवता आर्थिक व्यवहाराबरोबरच सामाजिक, राष्ट्रीय, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यात सहयोग व सहभाग घेवून संस्था समाजाभिमूख, लोकाभिमूख करावी लागेल.

सहकाराचे बोधवाक्य हातात हात, म्हणजेच ''एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ'' असे आहे. पायात पाय असे नाही हे हेरून ''सहकार हा संस्कार'' समजून सहकार एक प्रवृत्ती व एक संस्कृती म्हणून जोपासावी लागेल. महाराष्ट्रातील सहकार हा आता वेगळ्या वळणावर असून त्यानिमित्त्याने गुणात्मक व संघटनात्मक बदल करून एक उत्तुंग झेप घेण्याचा जो क्षण येईल तो सर्वसामान्यांसाठी सुदिनच समजावा.

# सहकारातील आव्हाने समस्या आणि उपाय



**अर्जुनपंत शेटे**
उपाध्यक्ष
काटोल नागरी
सहकारी पत संस्था मर्या. काटोल

सहकार हा एक संस्कार आहे. सहकार ही एक 'संकल्पना' आहे. आणि तिचा विकास करावयाचा असेल तर सहकारांत काम करणाऱ्या प्रत्येकाने आपल्या आचरणाने व नितीने तो फुलविला पाहिजे, तरच त्याची रसाळ आणि गोमटी फळे प्रत्येकाला चाखता येतील. देशातील सहकाराचे शतक उलटून गेल्यानंतर दुर्दैवाने कांही अपप्रवृत्तींनी त्यावर ताबा मिळविला आणि यामुळे पुरा सहकार अस्ताव्यस्त झाला. यामुळे नवनवी आव्हाने निर्माण झाली. देशात सर्वात मोठा सहकार आज महाराष्ट्रात आहे. यामुळे आजही महाराष्ट्रातील सहकाराची आव्हाने आणि त्यातील समस्या याचा अभ्यास केला तर यावर उपाय सापडतील आणि पुन्हा आपला सहकार 'समृद्ध' होईल.

पतसंस्थांच्या बाबतीत बोलयचे झाल्यास आपल्याच राज्यातील एक मल्टीस्टेट पत संस्था देशात जरी मोठी असली तरी जागतिक पातळीवर 'वॉक्यू' (WOCCU) या जागतिक पतसंस्था महासंघाच्या तुलनेत खूपच छोटी आहे. त्यामुळे अर्थसहाय्य करण्याची कुवत नक्कीच कमी होते.

सहकारात ''काहीही व कसेही वागले तरी चालते'' या प्रवादामुळे अपप्रवृत्ती वाढली, वारेमाप खर्च करण्याची प्रवृत्ती वाढली. सहकारी संस्था या लोकशाही मार्गाने चालतात. त्यावरील नियंत्रण 'स्वयंपूर्ण' असते. यावरुन आपल्याला 'कोणीही काही म्हणत नाही' असा समज करून घेतल्याने 'हम करे सो कायदा' सारखी प्रवृत्ती वाढत गेली.

याचा परिणाम अखेर खाबुगिरी वाढण्यांत झाला. हळूहळू स्वाहाकारही वाढत गेला. कधी कधी कार्यकर्त्यांना नोकरी लावतांना, कधी टेंडर मंजूर करतांना, तर कधी कर्ज मंजूर करतांना, तर कधी ते वितरीत करतांना 'कमीशन' घेतले जावू लागले.

सहकारांत भरपूर नफा कमावण्याची संकल्पनाच अभिप्रेत नसल्याने केवळ माफक नफा मिळविण्याबरोबरच सभासदांच्या कल्याणाला अग्रक्रम दिल्याने (रिझर्व बँकेच्या सूचनावरून) संस्थांना ऑपरेटींग प्रॉफीट असूनही आवश्यक आर्थिक तरतूदी करतांना अखेर तोटा प्राप्त झाला हे कळलेही नाही.

सहकारांत 'व्यावसायिकता' अभावानेच दिसते. 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' हे सहकाराचे ब्रिदवाक्य असल्याने, सहकारातील व्यवसायांत नफा नसेलही पण व्यवसाय पुढे चालवायचा विसरून गेले. यामुळे तोटे वाढण्यास मदत झाली.

सहकारात बंधुतत्वावर करणाऱ्या आपल्याच सहकारी संस्थाबरोबर स्पर्धा निर्माण झाली. म्हणजे असे की एकाच नगरांत पतसंस्थांच्या शाखा उभ्या टाकल्याने गळेकापू स्पर्धा निर्माण झाली. यातून व्याजदराच्या जाहीरातीचे युद्ध सुरू झाले. यात सहकारी संस्थांचे नुकसानच झाले.

सहकारी संस्थांचा मुख्य व्यवसाय हा 'कर्ज देणे' हा आहे. पण संचालक मंडळाच्या दबावामुळे मर्जीतील अयोग्य कर्जे देण्यात आल्यामुळे थकीत कर्जाचे प्रमाण वाढत गेले.

कर्ज प्रस्ताव सादर करतांना कर्जदाराचे पूर्व निरीक्षण आणि कर्ज दिल्यानंतर कर्ज प्रदानोत्तर निरीक्षण करण्याची पद्धत पूर्ण डावलून शॉर्टकट मेथड अवलंबल्याने एन.पी.ए. चे प्रमाण वाढत गेले.

सहकाराला वेळीच समर्थ व आर्थिकदृष्ट्या मजबूत करावयाचे असेल तर खालील उपायांची अंमलात आणने गरजेचे आहे.

१) सहकारातील कर्मचारी, अधिकारी व संचालकांना प्रशिक्षण हा खर्च नसून गुंतवणूक आहे. म्हणून सर्व घटकांना अल्पमुल्यात प्रशिक्षण मिळाले पाहिजे. राज्य सहकारी संघाने मुख्यत: यात पुढाकार घ्यायला हवा.

२) यापुर्वी आयकर कलम ८० (पी) खाली सर्व सहकारी संस्थान आयकरांत सुट होती. पण नंतर संस्था नफा कमावतात म्हणून व्यापारी तत्वाप्रमाणे आयकर लागू केला. त्यामुळे आधीच दुर्बल असलेल्या संस्था अधिक दुर्बल झाल्यांत. केंद्र शासनाने (सहकार खाते) पुर्वीप्रमाणेच आयकर सवलत सुरू करावी यासाठी पुढाकार करणे गरजेचे आहे.

३) एकरकमी परत फेड योजना दरवर्षी जाहीर करण्याऐवजी कायमची लागू करावी आणि यात जाणून बुजून कर्जे थकविणाऱ्या कर्जदारांना या योजनेचा लाभ घेण्यास प्रतिबंध करावा.

४) थकबाकी वसूलीचे कायदे कडक करावेत. वसूली अधिकाऱ्यांना स्वतंत्र अधिकार प्रदान करावेत.

५) सहकार ही एक आदर्श संकल्पना आहे. यात शक्यतो राजकारणाचा शिरकाव होवू देवू नये.

६) संस्थेने अनावश्यक होणारे खर्च कटाक्षाने टाळावेत.

# सहकार शताब्दी पुर्ती महोत्सव...



दिवाकर खोडे,
व्यवस्थापक,
काटोल नागरी
सहकारी पत संस्था मर्या. काटोल

सन १९०४ ला ब्रिटीशांनी बिजारोपन केलेल्या सहकारी वृक्षाला सन २००४ ला १०० वर्ष पूर्ण झाले. या वृक्षाची संपूर्ण देशभर छाया पसरून महाराष्ट्रात सर्वाधीक व्यापुन टाकला आहे. या वृक्षाला वाढविण्यामध्ये प्रामुख्याने महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरू, वैकुंठभाई मेहता, यशवंतराव चव्हाण व डॉ.धनंजयराव गाडगीळ ह्या महान नेत्याचे नेतृत्व लाभल्यामुळे आज संपुर्ण देशातील ७५% जनता आपला उदर निर्वाह चालवितात.

पुर्वी खाजगी आणि सरकारी कारभार असल्यामुळे गरीब जनतेला दारीद्रयाला मुकाव लागत असे म्हणून या दोन्ही कारभाराच्या व्यतीरिक्त एक स्वतंत्र कारभार असायला पाहीजे म्हणून सरकारच्या अधिपत्याखाली सहकारी क्षेत्राची निर्मिती करून गरीब जनतेची समस्या सोडविण्यात आली. या क्षेत्राअंतर्गत शेतकरी व इतर दारिद्रय रेषेखाली असलेल्या व्यक्तींना सहकारी संस्था मार्फत कर्ज पुरवठा करून लागल्यामुळे गरीब जनता सावकारांच्या जाचातून मुक्त झाली.

सहकार म्हणजे एकत्रीत काम करणे. मानवी जीवनात सहकाराची प्रवृत्ती फार पुरातन आहे. आधुनिक सहकाराचा उगम औद्योगिक क्रांतीच्या दोषावर उपाय म्हणून झाला. सहकार हा संघटन प्रकार असून त्यात आपल्या हितसंवर्धनासाठी लोक स्वेच्छेने समानतेच्या भुमिकेवर संघटीत होतात. या संघटीत लोकांचे आर्थिक ध्येय समान असुन ते सामुहिक प्रयत्नातुन साध्य करणे शक्त असते. कारण यातील प्रत्येक व्यक्ती बहुतेक आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतो. परस्पर साहाय्यातून स्वावलंबनाच्या मार्गाने परस्परातील नैतिक ऐक्याचे धागे बळकट करून आपल्या वैयक्ति दुर्बलतेवर मात करता येते.

सहकारी संघटनेचा हेतु नफा मिळविणे नसुन सभासदांना सेवा पुरविणे हा असतो. सामाजीत हितसंबंध सुरक्षित राहावे या भुमिकेतुन सहकारी संस्थेतील सभासद स्वखुशीने एकत्र आलेले असतात. आर्थिकदृष्टया कमकुवत असलेला घटक एकत्र आल्याशिवाय औद्योगिक व्यावसायीकांकडून होणारे शोषन किंवा पिळवणुक थांबविणे शक्य होत नाही. त्यांचे संरक्षण करणे हे सहाकराचे मुख्य ध्येय आहे. स्वावलंबन, परस्पर सहकार्य सेवा आणि नैतिक अधिष्ठान हे सहकारी संस्थांचे चार आधारस्तंभ आहे.

सहकाराचा उदय गरजेपोटी झाला आणि आज सर्वच देशात सर्व क्षेत्रात सहकारी संस्था अस्तित्वात आल्या आहेत. यामुळे सहकारी चळवळ विश्वव्यापी बनली आहे. भौगोलिकदृष्ट्या सहकाराचा जेवढा विस्तार झालेला आहे. तेवढा विस्तार कोणत्याही व्यवसाय संघटनेचा झालेला नाही.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला उदंड नेते प्रणेते लाभले आणि म्हणूनच ही चळवळ यशस्वी होऊ शकली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना त्यांच्या प्रेरणेने गुलाबराव पाटील यांनी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व अन्य सहकारी संस्था नावारूपाला आणल्या. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणावर त्यांचा खुप विश्वास होता. सन १९४९ मध्ये पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी भारतातील पहीला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर जिल्हा अहमदनगर येथे सुरू केला. लौकीक कार्याने शिक्षण बसलेले विखे पाटील डॉ.धनंजयराव गाडगीळांच्या आर्थिक सल्ल्यामुळे हे महत्वाचे पाऊल उचलु शकले. पंडीत नेहरू यांनी स्वतः कारखान्याला भेट दिल्यानंतर पद्मश्री किताबाने त्यांना गौरवित केले. विद्यापिठांना डिलीट व डॉक्टरेट पदव्या प्रदान केल्या. त्या दोघांच्या कामाची कृतज्ञता म्हणुन पुण्याच्या सहकारी प्रशिक्षण संस्थानला डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांचे नांव देण्यात आले. तर नागपूरच्या प्रशिक्षण संस्थानला डॉ.धनंजयराव गाडगीळ नाव देण्यात आले. डॉ.धनंजयराव गाडगीळ यांचे विचार ''जीवन म्हणजे सहजीवन व सहजीवन म्हणजेच सहकार होय'' सहकार ही समाजाची जीवनप्रणाली असुन ती यशस्वी होणे गरजेचे आहे.

सहकारात प्रत्येक सभासद हा अन्य सभासदांच्या हितांचा व कल्याणाचा विचार करीत असतो. त्यामुळे ''एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक'' या तत्वाचा अंगीकार केल्या जातो.

सहकार चळवळीने मिळविलेले यश बरेच बोलके आहे. पण तिला अजुन बरेच मिळवायचे आहे. ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारणे व त्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करणे हे सहकारी चळवळीचे भविष्य कालीन ध्येय आहे.

सहकार चळवळीला १०० वर्ष पूर्ण झाल्यामुळे संपुर्ण देशभर सहकार शताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला होता. म्हणून सहकारी चर्चासत्र सहकार आयोजन व सहकार दिंडी इत्यादी प्रकारचे शताब्दीपुर्ती महोत्सव साजरा करण्यात आला होता.

जय सहकार, जय महाराष्ट !

# सहकारी चळवळीचा इतिहास एक दृष्टीक्षेप

१) सहकाराची सुरूवात जगामध्ये सन १८४४ मध्ये इंग्लंडमधील रॉशडेल इक्विटेबल पायोनिअर्स सोसायटी या संस्थेच्या स्थापनेपासून झाली.

२) रैफेझन पतपुरवठा सोसायटी हेडेसपार्क, जर्मनी येथे सन १८६४ साली सुरू झाली.

३) सन १९०४ चा हिंदुस्थान सहकारी कृषी पतपुरवठा संस्थाचा कायदा भारतामध्ये केंद्र शासनाकडून संमत.

४) पहिली शेतकी सहकारी पतपेढी कंगिनहल जिल्हा धारवाड येथे स्थापन झाली.

५) सन १९१२ चा हिंदुस्थान सहकारी संस्थांचा कायदा केंद्र शासनाकडून संमत.

६) सन १९१४ मध्ये मद्रास येथे सहकारी संघाची स्थापना झाली.

७) सहकार प्रशिक्षण केंद्र सन १९१४ मध्ये बिहार राज्यामध्ये स्थापन झाले.

८) दि. १३ जुलै १९१८ रोजी दि बॉम्बे प्रोव्हिन्सियल को.ऑप. इंस्टिट्युट ची नोंदणी झाली.

९) मुंबई सहकारी संस्थांचा कायदा सन १९२५ मध्ये संमत.

१०) मुंबई सहकारी संस्थांचा कायदा १९२५ मध्ये प्रथम शिक्षणनिधीची तरतूद संस्थांना बंधनकारक केली.

११) भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना १९४८ मध्ये महाराष्ट्रातील लोणी बु, जि.अहमदनगर येथे सुरू झाला.

१२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ दि. २६ जानेवारी १९६२ रोजी राज्यात लागू झाले.

१३) आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने सहकाराची सात मूलतत्वे १९९५ मध्ये जारी केली.

१४) ९७ व्या घटनादुरूस्ती अन्वये महाराष्ट्र शासनाने दि. १४ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या अध्यादेशाद्वारे सहकारी कायद्यातील सुधारणा जाहीर केल्या आहेत.

# सहकाराची तत्वे व मुल्ये

सहकारी संस्थेत येणाऱ्या प्रत्येक सभासदास सहकाराची तत्वे नीट व चांगली माहिती असली पाहिजेत. संस्थेचा पाया चांगला व भक्कम होण्याचा तो एक मार्ग आहे.

इंग्लंडमधील ''रॉशडेल इक्विटेबल पायोनिअर्स'' या संस्थेच्या कामकाजातून व प्रत्यक्ष अनुभवातून झालेल्या अनुभूतीमधून सहकाराची तत्वे जन्माला आली आहेत.

फ्रेन्च क्रांतीमुळे 'लोकशाही' हा राजकीय विचार पुढे आला तर औद्योगिक क्रांतीमुळे 'भांडवलशाही' निर्माण झाली. भांडवलशाहीच्या दुष्परिणामामुळे ज्या अनेक आपत्ती निर्माण झाल्या त्यातून बाहेर पडण्यासाठी सहकारी चळवळीचा जन्म झाला. प्रथमत: सहकाराची खालील तत्वे मांडली गेली.

## सहकाराची तत्वे :

सहकारी तत्वे सहकाराची मुल्ये रूजविण्यास मार्ग-निर्देश देतात. वर्तमानकाळात सहकारी संस्थांनी कोणती तत्वे अंगिकारावी याचा विचार करून सन १९९५ मध्ये खालील तत्वे सहकारी व्यवहारात असावी असे आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने निर्देश दिले.

१. **स्वखुशीचे खुले सभासदत्व :-** ज्या व्यक्तींना ते सभासद होऊ इच्छित असलेल्या सहकारी संस्थेपासून, आपापल्या जबाबदाऱ्या जाणीवपूर्वक पार पाडून सदर संस्थेकडून उचित लाभ / फायदे मिळवण्याची क्षमता आहे, अशा व्यक्तींना केवळ जात, धर्म, लिंगभेदाचे आधारावर सदर संस्थेचे सभासदत्व नाकारता येणार नाही. सभासद होण्यासाठी सक्ती केली जावू नये. तो स्वच्छेने सभासद व्हावा.

२. **सभासदांचे लोकशाही नियंत्रण :-** लोकशाही कारभार हे तत्व प्रत्येक सहकारी संस्था तिच्या धोरण निर्धारण आणि निर्णय घेणेचे प्रक्रियेत प्रत्येक सभासदास सहभागी होणेस आमंत्रित करेल अशी मागणी करते. संस्थेचे प्रत्येक प्रश्नावर अगर समस्येवर निर्णय घेतांना त्याबाबत उपलब्ध संभाव्य निर्णय प्रकारांपैकी जो अधिकतम उचित निर्णय प्रकार असेल त्याचीच निवड करणे संस्थेस क्रमप्राप्त ठरते. सहकारी संस्थेत प्रत्येक सभासदाला एक मत देण्याचा अधिकार असावा.

३. **सभासदाची आर्थिक भागिदारी :-** अनेक प्रकारातील सहकारी व्यवहार आणि व्यवसायाशी संबंधित असलेले हे तत्व आहे. या तत्वाला सभासदांचा आर्थिक आणि वित्तीय सहभाग असे संबोधले आहे. या तत्वात सभासदांचे संस्थेच्या भांडवलावरील नियंत्रण या बाबीस विशेष महत्व देण्यात आले आहे. व ते असेही दर्शविते की, सभासदत्वाची एक अट म्हणून त्यांनी संस्थेत गुंतविलेल्या भांडवलावर सभासदांनी मर्यादित परतावा / भरपाईची प्राप्ती मान्य केली पाहिजे.

४. **स्वायत्तता आणि स्वातंत्र्य :-** सभासदांना व त्यांचे सर्वसाधारण सभेला संस्थेचेबाबत व सभासदांचे हिताचे निर्णय घेणेस स्वातंत्र्य आहे. लोकशाही मार्गाने संस्थेचे संचलन करतांना स्वायत्तता अभिप्रेत आहे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, संस्थेने ठरावलेले उद्दिष्ट व त्याचे पूर्ततेस्तव आखलेली धोरणे व त्यांची अंमलबजावणी करतांना संस्थेचे पोटनियम, सहकारी तत्वे व मूल्ये यांचा सुंदर मिलाफ होऊन संस्थेचे सभासदांचे आर्थिक हितास व संस्थेचे आर्थिक स्थैर्यास सर्वोच्च प्राधान्य देणे म्हणजेच स्वायत्तता.

५. **शिक्षण प्रशिक्षण आणि माहिती :-** या तत्वात सहकाराचे फायदे / लाभ योग्य रितीने विशद करण्यासाठी सभासद, संभाव्य सभासद व सहकारी कार्यकर्ते यांना सहकारी शिक्षण देणे आवश्यक आहे. सर्व सहकारी संस्थांनी सभासद, पदाधिकारी, सेवक यांचे सहकारी शिक्षण / प्रशिक्षणाची सोय केली पाहिजे. जागृत सभासद, कर्तबगार

६. **सहकारी संस्थांमधील परस्पर सहकार :-** हे तत्वे आपापल्या सभासदांच्या समान आर्थिक गरजा उत्कृष्टरित्या सोडविण्यासाठी सर्वांनी सुसंघटितपणे व समन्वयासहित एकत्रितरित्या काम करण्याविषयी आवाहन करते. या तत्वाची काळजीपूर्वक सुयोग्य कार्यवाही ही पूर्वीप्रमाणेच वर्तमान तसेच भविष्यकाळाचीही गरज आहे. सर्वप्रकारच्या सहकारी संस्थांनी आपापसात सहकार्य करणे अगत्याचे आहे. तसेच आपापसात संघर्ष टाळणेही आवश्यक आहे. सहकारी संस्थांत जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करून एकमेकांसाठी सहकार्य, भांडवल पुरवठा व अडचणीच्यावेळी सहाय्य केल्यास सहकारी चळवळीचा मोठ्या प्रमाणात विकास होईल व ती सामर्थ्यवान होईल.

७. **समुदायाप्रती निष्ठा :-** हे तत्व सहकाराची परंपरागत सामाजिक बांधिलकी स्पष्ट करते. या तत्वात सातत्यपूर्ण मानवी विकास गृहीत आहे. सहकारी संस्थांनी अधिकाधिक लोकांना त्यांच्या आशा, इच्छा, आकांक्षा सहकारी संस्थांमार्फत साध्य करणेसाठी आकर्षित करणे आवश्यक आहे.

शेवटी प्रत्येक सभासदाने, पदाधिकाऱ्याने आणि सेवकाने आपापल्या सहकारी संस्था कमाल परिणामकारतेने चालविण्याची पराकाष्ठा केलीच पाहिजे. सभासदत्वाच्या लाभांचे / फायद्यांचे समारंभपूर्वक प्रगटीकरण करणे, सहकाराच्या तत्वांचे असामान्य, अद्वितीय, अतुलनीय सामर्थ्यास मान्यता देणे, निर्वाचित नेते, संस्थांचे सेवक, सभासद यांना त्यांचे उचित अधिकार आणि हक्क प्रदान करणे, दरदर्शीपणे साधन सामग्रीचा एकत्रित वापर करणेचे कामी सहकारी संस्थांना मदत करणे. त्यांचे आर्थिक सामर्थ्य सुधारण्यास सहाय्य करणे आणि सहकारी चळवळीच्या उपयुक्ततापूर्ण धोरण व्यवसायनीती निश्चिती बद्दल सतत सावध त्याचप्रमाणे सतर्क विचार करणेस ही तत्वे पोषक राहतील.

## – सहकारी मूल्ये –

१. स्वयंसहाय्य किंवा स्वावलंबन (Selfhelp)
२. लोकशाही कारभार (Democracy)
३. समता / समान दर्जा (Equality)
४. न्याय / न्यायबुद्धी (Equity)
५. दृढ ऐक्य / एकता (Solidarity)
६. स्वयंजबाबदारी (Self Responsibility)

उपरोक्त मुल्ये खास करून सहकारी संस्थांच्या संघटनात्मक रचनेची वैशिष्टये स्पष्ट करतात. सहकारी संस्थांची स्वायत्तता अधोरेखित करतात. स्वायत्तता व तत्वांशी ही मूल्ये निगडीत आहेत.

१. प्रामाणिकपणा (Honesty)
२. खुलेपणा / पारदर्शकता (Openness)
३. सामाजिक जबाबदारी (Social Responsibility)
४. दुसऱ्यांबद्दल काळजी किंवा आस्था (Caring for others)

उपरोक्त मूल्ये सहकारी कार्यकर्ते आणि त्यांच्या सहकारी संस्था यांच्या मधील परस्पर बांधिलकी विषद करतात आणि ती नैतिक मूल्ये आहेत.

स्वयंसहाय्य किंवा स्वावलंबन, स्वयंजबाबदारी, लोकशाही कारभार, समान दर्जा किंवा समता, न्याय/न्यायबुद्धी आणि दृढ ऐक्य किंवा एकता ही सहकारी संस्थांची आधारभूत मूल्ये आहेत.



जेष्ठ सभासद सन्मान योजना शुभारंभ प्रसंगी




आपण अनुभवसंपन्न, कर्तव्यसंपन्न
अनेक सुख दुःखाच्या आठवणींचा संचय.
जीवन सरिताच्या प्रवाहातून न्हावून,
ताणून-सुखातून निघालेला.
आजच्या दिनी गतकाळाचा स्मृतीपट दृष्टिसमोर
सरकत असतांनाचे समाधान.
वृद्धापकाळ आयुष्याची संध्याकाळ
परंतू सूर्यास्तही मनाला मोहून टाकणारा असतो.
मावळतांना अगदी सहज, अलिप्तपणानं
आपली प्रकाशकिरणे काढून घेतो.
सहजतेने निघून जाणंहे जीवनाच ध्येय शिकवितो.
परमेश्वराने ज्येष्ठपणाची मंजील गाठण्याची संधी दिली
त्याचे उपकार आपण भाग्यवान.
म्हणून त्याचे भजन करून, मनन-चिंतन करून
पुढील आयुष्य रम्य करण्यासाठी आपणाला
**हार्दिक शुभेच्छा**



## माझी पतसंस्था - काटोल नागरी पतसंस्था

# काटोल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. काटोल, र.नं.९०१

## संस्थेला प्राप्त झालेले विविध पुरस्कार







## काटोल नागरी सहकारी पतसंस्था जिल्हा-स्तरीय आदर्श पतसंस्था पुरस्काराने सन्मानीत

स्थानिक अग्रगण्य पतसंस्था काटोल नागरी पतसंस्थेला सन २०१४-१५ या वर्षाकरिता विदर्भ क्रेडीट को. ऑप. सोसायटीज फेडरेशनच्या श्री.क्षेत्र शेगाव येथील सोहळ्यात नुकतेच आदर्श पतसंस्था म्हणून सन्मानीत करण्यात आले. जिल्हा स्तरीय आदर्श पत संस्था पुरस्कार स्पर्धेमध्ये उत्कृष्ठ गुणांकन मिळवून या पतसंस्थेची निवड करण्यात आली. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात संस्थेने केलेली आर्थिक व सामाजिक प्रगती या निकषावर संस्थेला मिळालेल्या गुणांकावर पुरस्कारासाठी


अध्यक्ष घनश्याम पुंड, विनायकराव ठाकरे व बहुसंख्य कर्मचारी सहभागी होते.



अमित काकडे, सुधाकर ...णकर, सौ.लता मानकर ...तर व्यवस्थापक कृष्णा

साप्ताहिक चर्चा वार्तापत्र तर्फे सर्व संचालकगण व कर्मचारी वर्ग यांचे अभिनंदन व शुभेच्छा


## सहकार विभागाकडून घनश्याम पुंड यांचा गौरव



काटोल ■ सहकार तत्त्व व सहकारी चळवळ वृद्धिंगत करून आर्थिक व सामाजिक दायित्व यशस्वीपणे पार पाडल्याची दखल घेत नागरी सहकारी पतसंस्था काटोलचे अध्यक्ष घनश्याम पुंड यांचा सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था पुणे अनिल कवडे यांच्या हस्ते नागपूर येथे नुकताच गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य फेडरेशनचे अध्यक्ष जगदिश किल्लोळ, संस्थेचे अध्यक्ष सुभाष मानकर, उपाध्यक्ष नरेंद्र मानकर, ज्येष्ठ संचालक गोपीचंद ढोके, नागपूर जिल्हा फेडरेशनचे संचालक प्रवीण गोतमारे, भिमराव काळे, गणेश लवणकर, व्यवस्थापक दिवाकर खोडे, कर्मचारी उपस्थित होते. घनश्याम पुंड हे २६ वर्षांपासून पतसंस्थेला प्रगतीपथावर ठेवले आहे. महाराष्ट्र शासनाचा सहकार विभाग आणि नागपूर जिल्हा पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अयोजित कार्यशाळेच्या माध्यमातून त्यांनी जिल्हा स्तरावर सहकार चळवळ वृद्धिंगत करून आर्थिक व सामाजिक दायित्व पार पाडले. त्यांच्या कार्याची दखल घेत नागपूर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष राजेंद्र घाटे यांनी कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन केले.(श.प्र.)

## गौरव संपन्न






# YEAR 2025

| JANEWARY | | | | | | FEBRUARY | | | | | | MARCH | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| S | | 5 | 12 | 19 | 26 | S | | 2 | 9 | 16 | 23 | S | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| M | | 6 | 13 | 20 | 27 | M | | 3 | 10 | 17 | 24 | M | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| T | | 7 | 14 | 21 | 28 | T | | 4 | 11 | 18 | 25 | T | | 4 | 11 | 18 | 25 |
| W | 1 | 8 | 15 | 22 | 29 | W | | 5 | 12 | 19 | 26 | W | | 5 | 12 | 19 | 26 |
| T | 2 | 9 | 16 | 23 | 30 | T | | 6 | 13 | 20 | 27 | T | | 6 | 13 | 20 | 27 |
| F | 3 | 10 | 17 | 24 | 31 | F | | 7 | 14 | 21 | 28 | F | | 7 | 14 | 21 | 28 |
| S | 4 | 11 | 18 | 25 | | S | 1 | 8 | 15 | 22 | | S | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| APRIL | | | | | | MAY | | | | | | JUNE | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| S | | 6 | 13 | 20 | 27 | S | | 4 | 11 | 18 | 25 | S | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| M | | 7 | 14 | 21 | 28 | M | | 5 | 12 | 19 | 26 | M | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| T | 1 | 8 | 15 | 22 | 29 | T | | 6 | 13 | 20 | 27 | T | 3 | 10 | 17 | 24 | |
| W | 2 | 9 | 16 | 23 | 30 | W | | 7 | 14 | 21 | 28 | W | 4 | 11 | 18 | 25 | |
| T | 3 | 10 | 17 | 24 | | T | 1 | 8 | 15 | 22 | 29 | T | 5 | 12 | 19 | 26 | |
| F | 4 | 11 | 18 | 25 | | F | 2 | 9 | 16 | 23 | 30 | F | 6 | 13 | 20 | 27 | |
| S | 5 | 12 | 19 | 26 | | S | 3 | 10 | 17 | 24 | 31 | S | 7 | 14 | 21 | 28 | |

| JULLY | | | | | | AUGUST | | | | | | SEPTEMBER | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| S | | 6 | 13 | 20 | 27 | S | 31 | 3 | 10 | 17 | 24 | S | | 7 | 14 | 21 | 28 |
| M | | 7 | 14 | 21 | 28 | M | | 4 | 11 | 18 | 25 | M | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| T | 1 | 8 | 15 | 22 | 29 | T | | 5 | 12 | 19 | 26 | T | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| W | 2 | 9 | 16 | 23 | 30 | W | | 6 | 13 | 20 | 27 | W | 3 | 10 | 17 | 24 | |
| T | 3 | 10 | 17 | 24 | 31 | T | | 7 | 14 | 21 | 28 | T | 4 | 11 | 18 | 25 | |
| F | 4 | 11 | 18 | 25 | | F | 1 | 8 | 15 | 22 | 29 | F | 5 | 12 | 19 | 26 | |
| S | 5 | 12 | 19 | 26 | | S | 2 | 9 | 16 | 23 | 30 | S | 6 | 13 | 20 | 27 | |

| OCTOBER | | | | | | NOVEMBER | | | | | | DECEMBER | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| S | | 5 | 12 | 19 | 26 | S | 30 | 2 | 9 | 16 | 23 | S | | 7 | 14 | 21 | 28 |
| M | | 6 | 13 | 20 | 27 | M | | 3 | 10 | 17 | 24 | M | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| T | | 7 | 14 | 21 | 28 | T | | 4 | 11 | 18 | 25 | T | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| W | 1 | 8 | 15 | 22 | 29 | W | | 5 | 12 | 19 | 26 | W | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| T | 2 | 9 | 16 | 23 | 30 | T | | 6 | 13 | 20 | 27 | T | 4 | 11 | 18 | 25 | |
| F | 3 | 10 | 17 | 24 | 31 | F | | 7 | 14 | 21 | 28 | F | 5 | 12 | 19 | 26 | |
| S | 4 | 11 | 18 | 25 | | S | 1 | 8 | 15 | 22 | 29 | S | 6 | 13 | 20 | 27 | |

नववर्षात नवीन संकल्पना, नवीन कल्पकता स्विकारून
नवप्रेरणेने प्रेरीत होऊन प्रगती-पथक्रमण करण्यासाठी

## नववर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा ...

## *Happy New Year 2025*

### संचालक मंडळ

**घनश्याम पुंड**
अध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| नरेंद्र मानकर<br>उपाध्यक्ष | अर्जुनपंत शेटे<br>संचालक | छत्रपात (प्रवीण) गोतमारे<br>संचालक | |
| अमित काकडे<br>संचालक | अजय लाडसे<br>संचालक | सुभाष कोठे<br>संचालक | गणेश लवणकर<br>संचालक |
| भिमराव काळे<br>संचालक | गोपीचंद ढोके<br>संचालक | सचिन उमप<br>संचालक | लता मानकर<br>संचालिका |
| कोमल मानकर<br>संचालिका | ॲड.आनंद देशमुख<br>स्विकृत संचालक | दिनकर गहाणे<br>स्विकृत संचालक | दिवाकर खोडे<br>व्यवस्थापक |

